RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५४ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.१२ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## स्वच्छ वायू सर्वेक्षण : शहरांची क्रमवारी जाहीर

### मध्यम शहराच्या वर्गवारीत अमरावतीला पहिला क्रमांक प्राप्त : स्काय वॉच ग्रुपचे सुरेश चोपणे यांची माहिती

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्रीय पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने केंद्रीय प्रदूषण नियंण मंडळाच्या माध्यमातून २०१९ पासून 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' अर्थात राष्ट्रीय स्वच्छ वायू सर्वेक्षण सुरू केले आहे. यात वायू प्रदूषणात आघाडीवर असलेली देशातील १३१ आणि महाराष्ट्रातील १९ शहरे समाविष्ट करण्यात आली आहेत. या शहरांना २०२४ पर्यंत २० ते ३० टक्के सूक्ष्म धूलिकण कमी करण्याचे ध्येय देण्यात आले आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी चांगले कार्य करणाऱ्या शहरांना पुरस्कृत करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात मोठ्या शहरांतील वर्गवारीत ठाणे तिसऱ्या क्रमांकावर असून मध्यम शहराच्या वर्गवारीत अमरावतीने पहिला क्रमांक प्राप्त केला आहे. विदर्भातील चंद्रपूर १५ व्या तर नागपूर १८ व्या क्रमांकावर आहे.




केंद्रीय पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून हे अभियान सुरू केले आहे. याद्वारे वायू प्रदूषणात आघाडीवर असलेल्या शहरांना वायू प्रदूषण कमी करण्यासाठी काही सूचना करण्यात आल्या होत्या. तसेच यादरम्यान वायू प्रदूषणात उत्तम कामगिरी करणाऱ्या शहरांना बक्षिसे देण्यात येणार होते. नुकतेच केंद्रीय पर्यावरण, वने आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाने स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२३ चे पुरस्कार जाहीर केले आहे.

राज्यात वायू प्रदूषणाबाबत उत्तम कामगिरी करणाऱ्या शहरांमध्ये अमरावती प्रथम, ठाणे तृतीय, नवी मुंबई आठव्या, मुंबई दहाव्या तर सर्वसाधारण प्रगती करणाऱ्या शहरांमध्ये चंद्रपूर पंधराव्या, लातूर सतराव्या, नागपूर सतराव्या स्थानी आहे. वाईट कामगिरी करणाऱ्या शहरांमध्ये नाशिक २१, पुणे २९, वसई विरार ३२, औरगांबाद ४०, सोलापूर १९, कोल्हापूर २३, बदलापूर ३०, उल्हासनगर ३१, अकोला ३२, जळगाव ३३, सांगली ३५ आणि जालना ३६ व्या क्रमांकावर आहे. हे सर्व पुरस्कार उत्कृष्ट घनकचरा, जैविक कचरा व्यवस्थापन आणि कचरा ज्वलन रोखणे, रस्त्यावरील धूलिकणाचे नियंत्रण, बांधकामावरील धूलिकणाचे नियंत्रण लक्षात घेऊन हे पुरस्कार देण्यात आले आहे, अशी माहिती स्काय वॉच ग्रुपचे सुरेश चोपणे यांनी दिली.

## दिशा सालियन मृत्यू प्रकरण; आजच होणार एसआयटी स्थापन, राज्य सरकारचे मुंबई पोलिसांना आदेश

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

दिशा सालियन मृत्यूप्रकरणी आज एसआयटी स्थापन होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना राज्य सरकारनं लेखी आदेश जारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. राज्य सरकारनं मुंबई पोलिसांना पत्राद्वारे याबाबत आदेश दिले आहेत. नागपूर इथं सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात दिशा सालियन प्रकरणात युवा सेनेचे नेते आदित्य ठाकरे यांची एसआयटी चौकशी होणार असल्याची माहिती शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांनी दिली होती. त्यानंतर दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आदित्य ठाकरे यांची एसआयटीच्या माध्यमातून तपास करण्यासाठी भाजपाच्या नेत्यांनी जोर धरला होता.



राज्य सरकारनं मुंबई पोलिसांना एसआयटी स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. अतिरिक्त पोलीस आयुक्त उत्तर विभाग यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. दिशा सालियनचा २०२० मध्ये मृत्यू झाला. दिशानं आत्महत्या केली असल्याचं सांगितलं जात होतं. परंतु हा मृत्यू संशयास्पद मानला जात होता. राज्य सरकारला या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी हवी आहे, म्हणून विशेष तपास पथकाची म्हणजेच एसआयटीची स्थापना होणार आहे.

दिशा सालियन ही एक सेलिब्रिटी मॅनेजर होती. दिशा सालियननं अनेक सेलिब्रिटींसाठी काम केलं होतं. यामध्ये सुशांत सिंग राजपूतचाही समावेश आहे. दिशा सालियन दिवंगत बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंग राजपूतची मॅनेजर म्हणून लोकप्रिय झाली. दिशा सालियननं भारती सिंग आणि वरुण शर्मा यांच्यासह अनेक प्रसिद्ध भारतीय व्यक्तींसोबत काम केलं आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार ९ जून २०२० मध्ये दिशानं १४ व्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली. मात्र अद्याप दिशा सालियनच्या आत्महत्येमागील कारणं समजू शकलेली नाहीत. दिशा सालियन आर्थिक संकटाचा सामना करत होती, अशी चर्चा करण्यात येत होती. त्यामुळे दिशा सालियननं हा टोकाचा निर्णय घेतला होता, अशी चर्चा तेव्हा होत होती. मात्र त्याला आता दिशा सालियनच्या आत्महत्येला वेगळं वळण लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## मविआचा आरोग्य मंत्र्यांवर निशाणा; मास्क, स्टेथोस्कोप लावून विधानभवनात आंदोलन

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यातील आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर आहे. सरकारी रुग्णालयांची स्थिती अत्यंत बिकट असून तिथे औषधे उपलब्ध नाहीत. रुग्णमृत्यू वाढले आहेत. औषध खरेदी थांबलेली आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने मंगळवारी विधानभवन परिसरात आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर निशाणा साधत आंदोलन केले.



तोंडाला मास्क लावून, गळ्यात स्टेथोस्कोप घालून आणि स्ट्रेचर आणून विरोधकांनी आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा वाजल्याचा आरो लगावला. 'जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या सरकारचा धिक्कार असो,' 'नाही औषध नाही गोळी, आरोग्य व्यवस्थेची झाली होळी,' 'शासकीय रुग्णालयात नाहीत डॉक्टर नाहीत नर्सेस, त्यामुळे वाढताहेत मृत्यूच्या केसेस' असे फलक घेऊन सरकारविरुद्ध निषेध नोंदविण्यात आला. गेल्या चार महिन्यांत चंद्रपूर शासकीय वैद्यकीय रुग्णालयात ४३६ मृत्यू, नांदेडमध्ये २४ मृत्यू, ठाणे-कळवा येथे २४ आणि छत्रपती संभाजीनगर येथेही २४ मृत्यू झाल्याकडे विरोधकांनी लक्ष वेधले.

राज्यभरातील विविध शासकीय वैद्यकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांचा मृत्यू वाढला आहे. त्याकडे सरकारचे दुर्लक्ष असल्याचा आरोप यावेळी लावण्यात आला. आरोग्य व्यवस्थेचे पुरते तीनतेरा वाजले आहेत, असे म्हणत विरोधकांनी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर टीका केली. आंदोलनात विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सचिन अहिर, विकास ठाकरे, सतेज पाटील, यशोमती ठाकूर आदींचा सहभाग होता.

**सरकार अपयशी**

राज्याची आरोग्य व्यवस्था ऑक्सिजनवर आहे. औषध खरेदी होत नसल्याने गरीब रुग्णांना बाहेरून औषधे विकत घ्यावी लागतात. शासकीय रुग्णालयात सुविधा नसल्यामुळे खासगी रुग्णालयात जावे लागत आहे. याचा निषेध म्हणून आम्ही आरोग्य मंत्री आणि आरोग्य यंत्रणेविरुद्ध प्रतीकात्मक आंदोलन केले आहे, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.

## ड्रग्स प्रकरणी कुणालाही पाठिशी घालणार नाही; देवेंद्र फडणवीसांचा सभागृहात शब्द

### ललित पाटील ड्रग्स प्रकरणी मंगळवारी विधान परिषदेत चर्चा

**दि.१२विदर्भ प्रजसत्ताक नागपूर**

ललित पाटील प्रकरणी ससूनचे अधिष्ठाता संजीव ठाकूर यांना कार्यमुक्त केले आहे. त्याचसोबत आवश्यकता भासल्यास त्यांना अटक करायलाही मागे पुढे पाहिले जाणार नाही. ही न्यायिक प्रक्रिया आहे. कुणाचेही या प्रकरणात धागेदोरे सापडले तर यात निश्चितच कारवाई होणार आहे.हे आंतरराष्ट्रीय स्तरावर षडयंत्र चालले आहे. मागील काळात आपल्याकडे किनाऱ्यावर वाहून आलेले ड्रग्ज सापडले त्यावर पाकिस्तानचा शिक्का आहे. पण आपल्याकडे आपल्या देशातील लोक वेगवेगळ्या फॅक्टरीत हे ड्रग्स तयार करतायेत हे दुर्दैवी आहे. राज्य सरकार या प्रकरणी रोज कुठे ना कुठे छापे टाकून कारवाई करतेय.या प्रकरणी कोणालाही सरकार पाठिशी घालणार नाही असं विधान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा पुढच्या भावी पिढीचा प्रश्न आहे. ड्रग्स हा एकप्रकारे हल्ला आहे त्याला उत्तर दिले पाहिजे. या प्रकरणी ज्यांचा थेट सहभाग मिळाला त्यांना तात्काळ निलंबित केले आहे. अधिष्ठातांविरोधात योग्य पुरावे असतील तर त्यांना बडतर्फ केले जाईल. यात सहाय्यक पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. गेल्या २ महिन्यात ड्रग्स प्रकरणी प्रचंड मोठ्या कारवाया झाल्या आहेत. जर आपण यावर कारवाई केली नाही तर आपली पुढील पिढी बर्बाद होऊ शकते. डार्कनेटच्या माध्यमातून याचा व्यवहार सुरू आहे. कुरिअरच्या माध्यमातून ड्रग्स विक्री केली जातेय. त्यावरही पोलिसांचे लक्ष आहे असं त्यांनी सांगितले.

ललित पाटील ड्रग्स प्रकरणी मंगळवारी विधान परिषदेत चर्चा झाली. ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी यावर प्रश्न उपस्थित केला. एका कैद्याला ७ महिने ससूनमध्ये ठेवले जाते. तिथेच गेटवर ड्रग्स सापडले जातात. त्यानंतर तो आरोपी ससूनमधून फरार होतो. हे आंतरराष्ट्रीय रॅकेट असून त्याचा शोध आहे. हे प्रकरण सरकारसाठी आव्हात्मक आहे. दक्षिण भारतातून ललित पाटीलला अटक केली. हा आरोपी पळाला नाही तर त्याला पळवले असं तो मीडियाला सांगतो. त्यामागे कोण शक्ती आहे याचा शोध घेतला पाहिजे. या प्रकरणात काहींना अटक केली. पण ललित पाटील याच्यावर ज्यांनी उपचार केले ते संजीव ठाकूर यांच्यावर अद्याप कारवाई नाही. या प्रकरणी नार्को टेस्ट करावी. हे प्रकरण आपण सीबीआयला देणार का असा प्रश्न अहिर यांनी उपस्थित केला.

## रस्ते अपघात रोखण्यासाठी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार, मुख्यमंत्र्यांची ग्वाही

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :**

रस्ते अपघात रोखण्यासाठी असलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून त्याचे दृष्यस्वरूपात बदल दिसून येतील, अशी ग्वाही आज राज्य परिवहन खात्याचे मंत्री आणि मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांच्याकडून विधानसभेत देण्यात आली. राज्यात राज्यातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी १७ ठिकाणी स्वयंचलित वाहन परवाना तपासणी मार्ग, २३ ठिकाणी स्वयंचलित वाहनयोग्यता प्रमाणपत्र केंद्र उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

काँग्रेस आमदार अशोक चव्हाण यांनी राज्यात होत असलेल्या वाहन अपघाताबाबत प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, समृद्धी महामार्गावर वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. आतापर्यंत किमान ६० ते ७० लाख वाहनांनी प्रवास केला असून समृद्धी महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक दहा किमी अंतरावर रम्बलर बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा देखील वापर करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

वाहन चालक परवाना स्वयंचलित पद्धतीने देण्यासाठी राज्यात १७ ठिकाणी ऑटोमॅटीक ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक उपलब्ध करून देण्यात येत असून त्यासंदर्भात त्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. ट्रॅकसाठी दोन महिन्यात कार्यादेश देण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. तर, २३ ठिकाणी ऑटोमॅटीक फिटनेस सेंटर्स देखील करण्यात येत असून वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्राची मदत संपण्यापूर्वी संबंधितांना पूर्वकल्पना देण्याबाबत यंत्रणा करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्याकडून यावेळी विधानसभेत सांगण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य श्रीमती वर्षा गायकवाड, देवयानी फरांदे यांनी भाग घेतला. तसेच, आरटीओच्या रिक्त जागा भरण्यात येणार का? असा प्रश्न वर्षा गायकवाड यांच्याकडून उपस्थित करण्यात आला असता, या प्रश्नाला उत्तर देताना दादा भूसे यांनी लवकरत याबाबतची नोंद घेण्यात येणार असल्याची माहिती सभागृहात दिली. तर आमदार देवयांनी फरांदे यांनी यावेळी प्रश्न उपस्थित विचारले की, रस्ते अपघातात चालकांच्या चुकीमुळे एखादा एपघात घडला तर त्या चालकाचा परवाना कायम स्वरुपी बाद करण्यात येणार का, त्यांच्या या प्रश्नाला मंत्री दादा भूसे यांनी अशा प्रकरणांमध्ये योग्य ती कारवाई करण्यात येत असल्याची माहिती दिली आहे.

## शरद पवार यांच्या दिर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी माझी प्रार्थना

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून शरद पवारांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संस्थापक आणि सर्वेसर्वा शरद पवार यांचा आज वाढदिवस. राष्ट्रीय नेते म्हणून शरद पवार यांची महाराष्ट्राला आणि देशाला ओळख आहे. त्यामुळे, त्यांचा वाढदिवस देशपातळीवर विविध ठिकाणी साजरा केला जातो. त्यातच, महाराष्ट्रात आजच्या दिवशी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या उत्साहात हा दिवस साजरा करतात. मात्र, यंदा महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट आहे, अवकाळीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, तर पुरेसा पाऊस-पाणीही नाही. त्यामुळे, शरद पवारांनी यंदाचा वाढदिवस साजरा न करण्याचं ठरवलं आहे. मात्र, देशभरातून, सोशल मीडियाच्या



माध्यमातून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत.

शरद पवार आज नागपुरातील युवा संघर्ष यात्रेच्या महासभेला उपस्थित राहणार आहेत. या सभेतून ते केंद्र आणि राज्य सरकारवर तोफ डागण्याची शक्यता आहे. नागपुरात फडणवीसांच्या बालेकिल्ल्यातून गृहमंत्र्यांना लक्ष करण्याची शक्यता आहे. दुसरीकडे आज त्यांचा वाढदिवस असल्याने राजकीय मतभेद विसरुन त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही शरद पवार यांना ट्विट करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. यापूर्वी कॉंग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या वाढदिनीही पंतप्रधानांनी शुभेच्छापर ट्विट केलं होतं. आता, शरद पवार यांच्या वाढदिनी ट्विट करत, शरद पवार यांच्या दिर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी माझी प्रार्थना, त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा... असे मोदींनी म्हटलं आहे.

## मागासवर्गीय आयोगाच्या कार्यालयात चहा द्यायला जातो का?; नितेश राणेंची राऊतांवर टीका

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

खासदार संजय राऊत यांनी मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांवर राजकीय दबाव असल्याचा आरोप केला होता. त्यावर बोलताना आमदार नितेश राणे यांनी, 'संजय राऊत मागासवर्गीय आयोगाच्या कार्यालयात चहा द्यायला जातो का? कुणावर दबाव आहे, कुणाला नाश्ता पाहिजे आहे का,' असा टोला लगावला.



मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना आमदार राणे म्हणाले,'अशा प्रकरणांमध्ये छोटे-मोठे अडथळे येत असतात. कुणाच्याही आरक्षणाला हातही न लावता मराठा समाजाला आरक्षण देणार, अशी महायुतीची भूमिका आहे.'

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या काळात आणखी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्य मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे हा राजीनामा ४ डिसेंबरला दिला आणि ९ डिसेंबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तो स्वीकारला. मात्र याबाबत सरकारने कुठलीही माहिती सभागृहात दिली नाही असा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

## भजनलाल शर्मा राजस्थानचे नवे मुख्यमंत्री

**दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

आज दुपारपासून राजस्थानमध्ये मुख्यमंत्रीपदाचा दावेदार ठरविण्यासाठी मॅरेथॉन बैठक सुरू होती. केंद्रीय निरीक्षक आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, विनोद तावडे आणि सरोज पांड्या यांनी राज्यातील महत्त्वाच्या नेत्यांशी चर्चा केली. दुपारी २ वाजता राजनाथ सिंह केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यासह जयपूर येथे आले. यावेळी माजी मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्रीपदाच्या दावेदार समजल्या जाणाऱ्या वसुंधरा राजे यांनी त्यांचे स्वागत केले. राजस्थानमधील भाजपा आमदारांची आज बैठक घेऊ आणि संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तुम्हाला नवा मुख्यमंत्री मिळेल, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सीपी जोशी यांनी दुपारी माध्यमांशी बोलताना म्हटले होते. त्याआधीच मुख्यमंत्रीपदाच्या नावाची घोषणा झाली.



## संपादकीय ......

# सोशल मीडिया मध्ये लोकांची ही वाढ चिंताजनक

*जगामधील जवळपास पाच अब्ज लोकांना सोशल मीडियाच्या व्यसनाने आपल्या कवेत घेतले आहे. २०२८ पर्यंत ही संख्या सहा अब्जावर जाणार आहे. झालेली ही वाढ लोकसंख्येच्या प्रमाणात ६१.४ टक्के एवढी असून एका सर्वेक्षणानुसार पुढील पाच वर्षांत आणखी १.१ अब्ज लोक सोशल मीडिया प्लॅटफार्ममध्ये सहभागी होतील. सोशल मीडिया प्लॅटफार्ममध्ये सहभागी होणार्या लोकांची ही वाढ चिंताजनक असून या क्षणिक सुखाच्या नादी लागून मनुष्य आपले जीवन उद्धवस्त करीत आहे. सोशल मीडियाने मानवी जीवनामध्ये फार मोठी क्रांती घडवून आणली असली, तरी त्याचे तोटेही तेवढेच आहेत. हे व्यसन कोणतीही शारीरिक इजा करीत नसले, तरी माणसाच्या मेंदूवर त्याचे होणारे भयंकर परिणामही समोर आले आहेत. सोशल मीडियाचा वापर करणार्या १० टक्के यूजर्सनी मान्य केले आहे की, इंटरनेटवर घालवण्यात येणारा वेळ कमी करणे त्यांना शक्य होत नाही. अशा लोकांच्या डोक्याचे स्कॅनिंग केले असता; त्यांच्या मेंदूमधील एका विशिष्ट भागामध्ये गडबड झाल्याचे आढळून आले आहे.*

*ड्रग्स सेवन केल्याने जसा मेंदूवर परिणाम होतो, तसाच परिणाम सोशल मीडियाच्या वापराने या लोकांवर झाला असल्याचा निष्कर्ष एका सर्वेक्षणामध्ये निघाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने सुखसुविधा जरी वाढल्या असल्या, तरी त्यामुळे एकमेकांतील संवाद, संपर्क व जिव्हाळा कमी झाला आहे. व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्रामच्या जाळ्यात अडकून त्यावरील आभासी सहानुभूतीच्या मृगजळामागे धावण्याची ही लागलेली स्पर्धा म्हणजे माणसाचा अंधार कोठडीकडचा प्रवास आहे. आजच्या आधुनिक युगामध्ये एकत्र कुटुंब पद्धत मोडकळीस आली असून विभक्त कुटुंबाचा उदो उदो होताना दिसत आहे. त्यामुळे घरातील मुलांकडे लक्ष देण्यासाठी पालकांना वेळ नाही. नवरा-बायको दोघेही नोकरी करीत असल्याने मुलांना घरामध्ये सोशल मीडिया हा एकमेव आधार वाटतो. सोशल मीडियावर तातडीने मिळणारा प्रतिसाद व प्रतिक्रियांमध्ये त्यांना होणारा आनंद गगनात मावेनासा होतो. त्यामुळे या मायाजालात अडकणार्या लहान मुलांची संख्या प्रचंड वाढली आहे. या लोकप्रियतेच्या भ्रमात त्यांची मानसिकता ढासळत चालली आहे. इंटरनेटच्या अती वापराने समाजामध्ये एका गंभीर आजाराने घर केले आहे. याकडे सामान्यांचे होत असलेले दुर्लक्ष म्हणजे आपली विनाशाकडे वाटचाल सुरू असल्याचे द्योतक आहे. संपूर्ण जगामध्ये तरुणाईला या व्यसनाने सर्वाधिक पछाडले आहे.*

*आयुष्याच्या या नाजूक वळणावर लागलेले हे व्यसन त्यांचे भावी आयुष्य उद्धवस्त करणार ठरेल, याची त्यास सुतराम कल्पना त्यांना नसते. खरं तर ही सर्व जबाबदारी पालकांची. परंतु, परंपरा व संस्कृतीला फारकत दिल्यामुळे बहुतांश पालक आपल्या मुलांना या व्यसनापासून दूर करू शकत नाही, हे वास्तव आहे. भौतिक सुखाच्या नादी लागून आपण आपलेच घर जाळीत आहोत, हे पालकांना अजूनही समजत नाही. ही हतबलता विनाशाकडे घेऊन जाणारी आहे. आजकाल आजी-आजोबांपासून नातवंडं दूर झाली. त्यांनी वृद्धाश्रमाचा रस्ता धरल्याने घराचं घरपण हिरावलं. त्यामुळे एकलकोंडी झालेली ही भावी पिढी रामायण व महाभारताच्या कथेला मुकली. परंपरा व संस्कृतीला दिलेली ही फारकत आमच्या जेव्हा लक्षात येईल तेव्हा बराच वेळ झालेला असेल.*

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत संपृक्तता

## साध्यतेसाठी गावपातळीवरील विशेष मोहिम

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** – शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. दोन हजार प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यात प्रतीवर्षी रू. सहा हजार लाभ अदा करण्यात येत आहे. लागवडीलायक क्षेत्रधारक, बँक खाती आधार संलग्न व योजनेचे ई केवायसी केलेले शेतकरी कुटुंब पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत. या योजनेचा राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) दिलीप झेंडे यांनी केले आहे.




राज्याच्या भूमी अभिलेख नोंदीनुसार (ठेठ नुसार) जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँकखाती आधार संलग्न व ई-केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांचा योजनेच्या लाभासाठी समावेश करण्यास अद्यापही वाव असल्याने केंद्र शासनाने दिनांक ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत गावपातळीवर ४५ दिवसांची विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आयुक्त यांनी महसूल, ग्रामविकास व कृषी या विभागांनी सर्व समन्वयाने राज्यातील पात्र शेतकऱ्यांना पी. एम. किसान योजनेत समाविष्ट करण्यासाठी या विशेष मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयं नोंदणी व शघधउ साठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र (उडउ) तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करण्यात आले आहे.

या विशेष मोहिमेमध्ये ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी लाभार्थींची योजनेतील सद्यस्थिती तपासणे व शघधउ करणे, पोर्टलवर नोंदणी करतांना जमीनीचा तपशिल भरणे, फेस ऑथेंटिकेशन पचा वापर करून शघधउ करणे यासाठी शेतकऱ्यांना मदत करतील. तसेच लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न केली असल्याची खातरजमा करतील. तसेच गावातील योजनेच्या लाभासाठी पात्र लाभार्थींचा शोध घेऊन योजनेच्या निकषांनुसार तपासणी अंती पात्र असलेल्या लाभार्थींना पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी समाविष्ट करण्यात येईल. तसेच विशेष मोहिमे अंतर्गत योजनेच्या लाभासाठी समाविष्ट करावयाच्या पात्र लाभार्थींसाठी विशेष ग्रामसभेंचे आयोजनही करण्यात येईल.

पी. एम. किसान योजनेचा १६ वा हप्त्याचा लाभ येत्या जानेवारी महिन्याच्या शेवटी वितरीत करण्याचे केंद्र शासनाचे नियोजन आहे. योजनेसाठी नोंदणी करणे, ई-केवायसी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता शेतकऱ्यांनी स्वत: करावयाची आहे. यास्तव पी. एम. किसान योजनेच्या या ४५ दिवसांच्या मोहिमेमध्ये योजनेच्या निकषांच्या अधिन राहून पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करून घेण्याचे आवाहन राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजिकचे कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक,मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा, असेही प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# राज्यात वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बढतीत गौडबंगाल ?

**दि१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** राज्याच्या वनविभागात 'फिफ्टी – फिफ्टी'नुसारच्या फार्म्युल्याने पदोन्नत आणि सरळसेवा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची पदे भरली जातात. मात्र, नुकत्याच झालेल्या आरएफओंच्या डीपीडीसीच्या बैठकीत सरळसेवेतील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचा प्रशिक्षण कालावधी ग्राह्य धरून त्यांना सहायक वनसंरक्षक पदांवर बढती देण्याचा घाट मंत्रालयाने घातला आहे. वनविभागात आरएफओंची एकूण ९९६ पदे कार्यरत आहेत. २०१६पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून ५० टक्के जागा भरल्या जातात. सरळसेवेतून



आरएफओ म्हणून येणाऱ्या वनाधिकाऱ्यांना दीड वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सेवेत दाखल करून घेतले जाते आणि तेथूनच त्यांना सेवाज्येष्ठता लागू होते. मात्र, सहायक वनसंरक्षकांच्या बढतीमध्ये प्रशिक्षण कालावधी हा सेवाज्येष्ठता कालावधी गृहीत धरण्याची शक्कल वनमंत्रालयाने लढविली आहे. सन २०१३ – २०१४ मध्ये वनपाल पदावरून आरएफओ या पदावर पोहोचलेल्यांना बढतीत स्थान न देता सन २०१९मध्ये रूजू झालेल्या सरळसेवा आरएफओंना बढती देण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. ७ डिसेंबर २०२३ रोजी अत्यंत गोपनीय पद्धतीने १४७ पदांसाठी डीपीडीसी घेण्यात आली असून, या बढतीमध्ये सरळसेवा आरएफओंना मोठ्या प्रमाणात स्थान मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कारण पदोन्नत आरएफओंना तदर्थ श्रेणीत हेरून त्यांची सेवाज्येष्ठता या बढतीत डावलली जात असल्याने नाराजीचा सूर उमटत आहे.

# चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिरातील चार मूर्त्यासह पादुका चोरी, परिसरात खळबळ



**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – स्थानिक बुधवारा परिसरातीलआझाद चौकातील चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिरात सोमवारी सकाळी अनोळखी चोरट्याने प्रवेश करून मंदिरातील चार मुर्त्या आणि एक पादुका चोरी केल्याची घटना सोमवारी (ता. ११) सकाळी उघडकीस आली.

बुधवारा येथील चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर फार जुने आहे. परिसरातील जैन समाजबांधव दररोज दर्शनाकरिता येतात. पहाटेपासून मंदिराची दारे उघडली जातात. ११ डिसेंबरला सकाळी ५ च्या सुमारास एक महिला दर्शनाकरिता आली आणि पुजा करून निघून गेली. तेव्हा मंदिराचे दार उघडे होते. त्यानंतर ६ च्या सुमारास मानेकर मंदिरात आले, तेव्हा त्यांना देवपाटावरील भगवान महावीरांच्या७ ते ८ इंचाच्या मुर्त्या व पादुका बेपत्ता आढळल्या. त्यांनी परिसरातील नागरीकांना माहिती दिली. मंदिरात चोरी झाल्याची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच जैन समाजातील नागरिक मंदिरात पोहचले आणि पूर्ण मंदिराची पाहणी करून

खोलापुरीगेट पोलिसांना माहिती देण्यात आली. एकाचवेळी चार मुर्त्या चोरी गेल्याने ठसे तज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. मंदिरातील सीसीटिव्ही कॅमेऱ्याची पाहणी करण्यात आली. खोलापुरी गेट पोलिसांनी प्रदीप देविदास मानेकर यांच्या तक्रारीवरून अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोलीस आयुक्तांच्या विशेष पथकाने काही युवकांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी केली जात आहे.




## २०२३ वर्षात गुगलवर 'हे' पदार्थ सर्वाधिक झाले सर्च; टेस्टीही आणि हेल्दी ही

**दि१२विदर्भ प्रजासत्ताक**

२०२३ वर्ष संपून २०२४ हे नवीन वर्ष सुरु व्हायला अवघे काही दिवसच राहिले आहेत. सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी सारेच उत्सुक आहेत. यावर्षी गुगलवर सर्वात जास्त हेल्दी पदार्थांना सर्च करण्यात आलं आहे. यावरून असं दिसून येते की, लोकांना चविष्ट आणि हेल्दी दोन्ही पदार्थ खायला आवडतात. भारताची निरोगी जीवनशैलीकडे वाटचाल सुरु आहे असं या सर्चवरून कळतंय. गुगलने २०२३ मध्ये सर्वाधिक शोधल्या गेलेल्या खाद्यपदार्थांची यादी जाहीर केली आहे. यावरून लोकांनी चवीबरोबरच आरोग्याचीही काळजी घेतल्याचे स्पष्ट होते. या वर्षी कोणते पदार्थ सर्वाधिक लोकप्रिय होते हे जाणून घेऊयात.

**बाजरी** – २०२३ मध्ये लोकांनी बाजरीबद्दल अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न केला. गुगलवर बाजरीचा सर्वाधिक शोध घेण्यात आला. बाजरीमध्ये बार्ली, बाजरी, कोदरा, नाचणी आणि कुटकी यांसारखी धान्ये असतात. हे सर्व अतिशय पौष्टिक आणि फायदेशीर धान्य आहेत. लोकांनी बाजरीपासून बनवलेल्या अनेक पाककृती देखील शोधल्या आहेत. बाजरी केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. त्यामुळे अनेक सेलिब्रिटींनीही आपल्या आहारात बाजरीचा समावेश केला आहे.

**एवोकॅडो** – हा गुगलवर दुसरा सर्वाधिक शोधलं जाणारं फळ आहे. एवोकॅडो अतिशय पौष्टिक आणि आरोग्यदायी आहे. एवोकॅडोमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि निरोगी फॅट असते. यामध्ये फायबर आणि पोटॅशियम देखील



मुबलक प्रमाणात आढळते. या सर्व गुणांमुळे लोकांनी एवोकॅडोला गुगलवर सर्वाधिक सर्च केले आहे.

**मटण रोगन जोश**– गुगलवर शोधलेल्या खाद्यपदार्थांमध्ये मटण रोगन जोश तिसऱ्या क्रमांकावर आहे. मटण रोगन जोश हा एक प्रसिद्ध काश्मिरी पदार्थ आहे. यामध्ये मटण मसालेदार ग्रेव्हीबरोबर शिजवले जाते. हा पदार्थ तुम्ही भात किंवा नान बरोबर देखील सहज खाऊ शकता. हा एक अतिशय चविष्ट पदार्थ आहे. म्हणूनच २०२३ मध्ये गुगलवर तो खूप वेळा शोधला गेला. कारण हा पदार्थ खूप फायदेशीर आणि चवदार आहे.

**काठी रोल्स** – काठी रोल या वर्षी गुगलवर सर्वाधिक शोधल्या गेलेल्या खाद्यपदार्थांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. यावरून असे दिसून येते की, लोकांना हा नाश्ता खूप आवडतो. काठी रोल हा एक प्रकारचा रोल आहे. ज्यामध्ये भाज्या, चिकन किंवा चीज इत्यादींचे पिसेस पिठापासून बनवलेल्या पातळ ब्रेडमध्ये टाकले जातात आणि त्याचा रोल केला जातो. वर चटणी किंवा सॉस बरोबर सर्व्ह केले जाते. हा अतिशय चविष्ट नाश्ता आहे. लोकांना ते बनवण्याची कृती आणि हे रोल्स कुठे मिळतात हे जाणून घेण्यात फार उत्सुकता होती.

# अंतराळवीर व्हायचे असेल तर शारीरिक ,मानसिक क्षमता,संपूर्ण आयुष्य पणाला लावण्याची तयारी ठेवा – आनंद घैसास

### स्व. सोमेश्वर पुसतकर व्याख्यानमाला

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– अंतराळवीर होण्यासाठी मजबूत शारीरिक व मानसिक क्षमता तर लागतेच सोबत संपूर्ण आयुष्य पणाला लावण्याची तयारी ठेवावी लागते, असे प्रतिपादन होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे निवृत्त वैज्ञानिक अधिकारी आनंद घैसास यांनी सोमवारी येथे केले.स्व. सोमेश्वर पुसतकर व्याख्यानमालेत 'अंतराळातील जीवन' या विषयावर बोलताना त्यांनी दैनंदिन जीवनातील पाणी पिणे, जेवण करणे, ब्रश करणे, झोपणे या साध्या-साध्या गोष्टी करताना अंतराळात किती प्रचंड कसरत करावी लागते, हे अतिशय रंजक शैलीत अनेक व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून सांगितले.याप्रसंगी त्यांनी मानवाचा अंतराळ प्रवास, वेगवेगळ्या देशाच्या अंतराळ मोहिमा, भारताची या विषयातील प्रगती या विषयावर जवळपास अडीच तास आपल्या वेधक शैलीत खूप सारी नवीन माहिती दिली. याप्रसंगी प्रेक्षकांच्या प्रश्नांची उत्तरेही त्यांनी दिलीत.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. दत्तात्रय पुसतकर कला महाविद्यालयाला 'नॅक' द्वारे 'बी प्लस' श्रेणीचे मानांकन मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या अध्यक्ष वृषाली पुसतकर, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे, उपाध्यक्ष बारस्कर कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर हिवसे, प्राचार्य विजय दरणे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा माजी आमदार बी. टी. देशमुख व दैनिक 'जनमाध्यम' चे संपादक प्रदीप देशपांडे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



# मेळघाटातील निकृष्ट सिमेंट रस्त्यांचे प्रकरण अधिवेशनात गाजणार

## जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक धारणी :** मेळघाटात रोजगार हमी योजनेच्या नावावर सार्वजनिक बांधकाम विभाग धारणीमध्ये सर्वाधिक सिमेंट काँक्रीट रस्ते बांधण्यात आले. त्यामध्ये १० गावातील रस्ते अत्यंत निकृष्ट बांधण्यात आल्याची तक्रार झाली होती. त्यात खा. नवनीत राणा, आ. रवी राणा यांनीसुद्धा मुख्यमंत्र्यांसह रोहयो मंत्र्यांकडे निकृष्ट कामांची तक्रार देताच जिल्हाधिकारी सौरभ कटीवार यांनी तत्काळ ५ सदस्यीय चौकशी समिती नेमून डिसेंबर महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याने मेळघाटात खळबळ उडाली आहे.हिवाळी अधिवेशानात देखील हा मुद्दा गाजणार असल्याचे संकेत आहे.



मेळघाटात धारणी सार्वजनिक बांधकाम विभागात रोहयोतून कोट्यवधींची सिमेंट काँक्रीट रस्ते तयार झाले आहे. त्यामध्ये कित्येक कामे निकृष्ट असल्याच्या तक्रारी आहे. शासन निधीचा दुरुपयोग करून निकृष्ट सिमेंट रस्त्यांची कामे करून दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध कार्यवाही अपेक्षीत आहे.

**नवनीत राणा, खासदार, अमरावती**



सार्वजनिक बांधकाम विभाग धारणीअंतर्गत रोहयो अंतर्गत मार्चमध्ये १५ कोटींचे १०० सिमेंट रस्ते तयार करण्यात आले होते. त्यामध्ये दिया, बासपाणी, टेंभली, मांडवा, टिंगऱ्या, दाबिदा,राणीतंबोली, दुनी, कढाव, चटवाबोड आदी १० गावात निकृष्ट सिमेंट रस्ते बांधून पूर्ण:निधींची उचल करण्यात आली.या संदर्भात तक्रारी झाल्या. मात्र तक्रारी रद्द करण्यात आल्या, पुन्हा जुलै, ऑगस्टमध्ये रोहयोतून पुन्हा २० कोटीचे सिमेंट रस्ते तालुक्यात , तयार करून २० कोटींची उचलकरण्यात आली. मात्र तालुक्यात काही गावात निकृष्ट रस्ते बांधले जात असल्याची लेखी तक्रार खा. नवनीत राणा आणि आ. रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांसह रोहयो मंत्र्यांकडे केली असता तक्रारीची दखल घेऊन रोहयो आयुक्त नागपूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून चौकशीचे आदेश दिले. जिल्हाधिरी यांनी याची तत्काळ दखल घेत ८ डिसेंबर रोजी ५ सदस्यीय समिती गठीत करून डिसेंबर महिन्यात वास्तुनिष्ठ, व्हीडीओ चित्रीकरणासह जबाबदार आढळणाऱ्याबद्दल लेखी स्पष्ट करावे, गुणवत्ता चाचणी मोजमाप पुस्तिका, अंदाजपत्रकाप्रमाणे आहे काय,वापरण्यात आलेली सामुग्री पडताळणीव चौकशी पुन्हा करण्याची आवशक्यता नाही याची दक्षता घेऊन चौकशी अहवाल ३१ डिसेंबर रोजी सादर करण्याचे आदेश दिले आहे.

### चौकशी समितीमध्ये 'यांचा' समावेश

पाच सदस्यीय चौकशी समिती अधिकारी धारणी रोहयो सिमेंट रस्ते प्रकरणाचे चौकशी समिती अध्यक्षपदी कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी तर सदस्यपदी तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी, उपविभागीय अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक विनोद देशमुख, गटविकास अधिकारी प्रफुल्ल भोरखडे, सहा. लेखा अधिकारी, विनोद रायबोले यांचा समावेश आहे.

## महिलांना अश्लील भाषेत बोलणाऱ्या गोल्डन फायबरच्या व्यवस्थापकाला शिवसेनेचा चोप

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ –** महिला कर्मचाऱ्यांना वारंवार अश्लील भाषेत बोलून महिलांचा अपमान करणाऱ्या गोल्डन फायबरच्या व्यवस्थापकाला शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी चांगलाच चोप दिला.परप्रांतीय असणाऱ्या व्यवस्थापकाने शिवसेना पदाधिकाऱ्यांना कॅबिन मधून हाकलून लावण्याचा प्रयत्न केल्याने संतप्त पदाधिकाऱ्यांनी व्यवस्थापक जे.एस. रावत याला प्रचंड मारहाण केली यावेळी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते मात्र वेळीच पोलीस पोहचल्याने पुढील अनर्थ टळला. घटनेची हकीकत अशी की, शिवसेनेच्या वतीने सोमवारी दुपारच्या सुमारास गोल्डब फायबर मध्ये कामगार संघटनेची स्थापना केली.सोमवारी सर्व पदाधिकारी व कामगार यांच्या उपस्थितीत फलक अनावरण करण्यात आले. मात्र व्यवस्थापक रावत हे कामगारांना संघटने मध्ये जाऊ नका असा दम भरत होते.

दरम्यान फलक अनावरण कार्यक्रमानंतर शिवसेना पदाधिकारी अरुण पडोळे, संतोष बद्रे,वेदांत ताल्हन, महेंद्र गाडे,प्रफुल्ल तायडे यांनी व्यवस्थापक रावत यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली मात्र रावत यांनी भेटण्यास नकार दिला.तेव्हा काही महिलांनी व्यवस्थापक रावत हे आम्हाला अश्लील भाषेत शिवीगाळ करत असल्याची तक्रार केली. यामुळे संतप्त झालेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी थेट कॅबिन गाठत रावत यांना याबाबत विचारणा केली. तर रावत यांनी पदाधिकाऱ्यांना कॅबिन मधून हाकलण्याचा प्रयत्न केला तेव्हा संतप्त पदाधिकाऱ्यांनी रावत यांना मारहाण करायला सुरुवात केली.

या प्रकरणामुळे परिसरात काही वेळ तणाव निर्माण झाला होता. नांदगाव पेठ पोलिसांनी लगेच घटनास्थळी धाव घेतल्याने पुढील अनर्थ टळला.नांदगाव पेठ पोलीस स्टेशनमध्ये याप्रकरणी तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



## क्यूआर कोडमुळे सुट्या पैशांच्या वादातून सुटली एसटी

### ऑनलाइन पेमेंट करून काढता येणार तिकीट



**दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** आता प्रत्येकाकडे एटीएम कार्ड व मोबाइल प आहेत. त्यातून अनेक जण ऑनलाइन पेमेंट करीत असतात. प्रत्येक जण आता डिजिटल पेमेंट करण्यावर भर देत आहे. त्यामुळे खिशात पैसे ठेवत नाही. त्यामुळे पैशांच्या अनेक समस्यांना एसटीतील वाहकांना प्रवाशांच्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. यातून अनेक वेळा वाद झाल्याच्या घटना पाहायला मिळत होत्या. त्यामुळे आता पीएमपीबरोबर एसटी महामंडळानेही ऑनलाइन तिकिटाची सुविधा सुरू केल्याने सूट वादातून एसटी सुटली आहे. त्याच धर्तीवर एसटीने तिकिटासाठीही ऑनलाइन पेमेंट देण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून डिजिटल मशीनची सुविधा सुरू केली आहे. पुणे विभागातील १४ आगारांत ही सुविधा सुरू झाली आहे. त्यामुळे प्रवासी आणि वाहकांमध्ये सुट्या पैशांसाठी होणारी कटकट मिटली आहे.

#### कार्ड स्वॅप करा अन् काढा तिकीट

सर्वत्रच डिजिटलची सोय झाल्याने प्रवासी घाईगडबडीने एसटी गाडीत बसतात; पण पैसे नसल्याने अनेक वेळा वादही झालेले आहेत. त्याच धर्तीवर एसटीच्या तिकिटासाठीही ऑनलाइन पेमेंट देण्याची सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## महिलांनी सद्गुणांचा शोध घ्यावा : मनीषा संत

### नारीशक्ती संमेलानाचा समारोप



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** महिलांनी स्वत:मधील सद्गुण शोधून त्यांचा उपयोग स्वत:साठी, कुटुंबासाठी, समाजासाठी व देशासाठी करावा, असे आवाहन राष्ट्र सेविका समितीच्या अ. भा. शारिरीक शिक्षण प्रमुख मनीषा संत यांनी केले. अमरावती येथील नारीशक्ती संमेलनाच्या रविवारच्या समारोपीय सत्रात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. यावेळी समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त माया गरकल, अंजली मुळे, संमेलन सहसंयोजिका भावना जोशी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होत्या.

मनीषा संत पुढे म्हणाल्या, मानवाने मानवाशी कसे वागावे याचा विचार करण्याची आज नितांत गरज आहे. त्यासाठी काही चांगले विचार वाचून, ऐकून चांगल्या सवयी स्वत:ला लावून घ्याव्या. प्रत्येकातच काही चांगले गुण असतात, याचा शोध घेऊन त्या गुणांचा विकास करावा.

अधिकार्यांकडे लक्ष न देता कर्तव्याचे पालन करण्यावर अधीक भर द्यावा, त्यातूनच आपण मोठे होतो. भारताच्या विकासात महिलांचा मोठा सहभाग आहे. शारिरीक विकास, निर्भयता, मानसिक विकास याकडे लक्ष द्यावे. जीवनमूल्ये आपल्या कृतीतून प्रवाहीत व्हावी. त्यासाठी आपण काय करू शकतो तर सुसंवाद करणे, कुटुंबाकडे लक्ष देणे, पर्यावरण संवर्धन, संस्कृतीचा सन्मान, भाषा, भूषा, भजन, भोजन, भ्रमण या गोष्टींकडे विशेष लक्ष देऊन शकतो. स्वविकास, समाज विकास, राष्ट्र विकास करण्यात सहकार्य करावे. मातृ स्वरूपिणी नारी शक्तीच हे करू शकते, याची जाणीव ठेवून मातृकर्तव्य पार पाडावे, असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.प्रमुख अतिथी माया गरकल म्हणाल्या, आजच्या नारीशक्ती संमेलनाचे महत्त्व फार मोठे आहे. महिलांनी महत्त्वाचे कार्य प्रामाणिकपणे करावे. या सत्राचे संचालन अनुभूती टवलारे यांनी केले. शर्मिला देशमुख यांनी वैयक्तिक गीत सादर केले. भावना जोशी यांनी सर्वांचे ऋणनिर्देश केले. शेवटी भारत मातेची आरती स्वागत समितीतील सर्व सदस्यांनी केल्यानंतर संमेलनाची सांगता झाली. संमेलनाला मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## पणन महासंघाच्या निवडणुकीत पुढाऱ्यांची एन्ट्री

### २६ डिसेंबर ला होणार निवडणूकीचे चित्र स्पस्ट

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** येत्या ७ जानेवारीला होऊ घातलेल्या महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाच्या निवडणुकीत दर्यापूरचे आमदार बळवंत वानखडे यांच्यासह पाच अमरावतीच्या माजी संचालक निवडणुकीत उतरले आहे. या निवडणुकीचे चित्र येत्या २६ डिसेंबर रोजी चित्र स्पष्ट होणार आहे.पणन महासंघाचे अध्यक्ष अनंतराव देशमुख, माजी संचालक तिवसा येथील पद्मा भडांगे, माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांचे समर्थक म्हणून परिचित असलेले वरुडचे सुजित पाटील आणि दुष्यंत अनंतराव देशमुख यांचा त्यामध्ये समावेश आहे. कापूस हे विदर्भाचे प्रमुख पीक आहे. परंतु पुरेसा भाव मिळत नसल्याने सध्या त्या पिकापेक्षा सोयाबीनला जास्त महत्त्व आले आहे. असे असले तरी कापसाच्या खरेदीला हक्काची बाजारपेठ मिळवून देण्याचे काम राज्य कापूस पणन महासंघाकडे असते. परंतु सध्याच्या काळात ही हक्काची बाजारपेठ कार्यरत नसल्याचे चित्र आहे. पणनच्या निवडणुकीत येथील अनंतराव देशमुख हे कापूस पणन महासंघाचे दीर्घकाळ अध्यक्ष राहिले आहेत. त्यांनी यावेळीही सहकारी संस्था व जिनिंग प्रेसिंग मतदारसंघातून उमेदवारी दाखल केली आहे. माजी आमदार साहेबराव तट्टे त्यांचे सूचक आहेत, दर्यापूरची काँग्रेसचे

आमदार बळवंत वानखडे यांनी अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव मतदारसंघातून उमेदवारी दाखल केली माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी त्यांचे नाव सुचवले आहे. तिवसा येथील शिक्षण संस्थेच्या पदाधिकारी असलेल्या काँग्रेसच्याच पद्मा भडांगे यांनी पुन्हा पणन महासंघाची निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे. यापूर्वी त्या पणन महासंघाच्या संचालक होत्या त्या महिला मतदारसंघातून या निवडणुकीत उभ्या आहेत.

#### उमेदवार अंतिम यादी २६ डिसेंबर ला

कापूस पणन महासंघाच्या निवडणुकीतील उमेदवारांची नेमकी संख्या २६ डिसेंबरला स्पष्ट होणार आहे. नागपूर येथील जिल्हा उपनिबंधक हे या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. त्यांच्या कार्यालयातर्फे निवडणूक रिंगणातील उमेदवारांची अंतिम यादी २६ डिसेंबरला घोषित केली जाईल.

## ग्रामीण भागातील डीपींची अवस्था दयनीय

**दि१२विदर्भ प्रजासत्ताककावली वसाड :**रब्बी पिकाला आता सिंचन करण्याची वेळ शेतकऱ्यावर येऊन ठेपली आहे परंतु धामणगाव तालुक्यातील अनेक गावातील शेतातील डीपींची अवस्था अत्यंत दयनीय असून शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

याच परिसरामध्ये संत्रा उत्पादक सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे आता संत्र्यांना सुद्धा सिंचन करण्याची वेळ आलेली असल्याची शेतकरी बोलत आहे परंतु शेतामधील डीपीची अवस्था अत्यंत दयनीय अवस्था बनली आहे. कोणत्याही डीपीवर गेले फेज गेले तर, कुठे डीपीवर ट्रान्सफार्मर म्हणजे बिघाड झाले आहेत, त्यामुळे रबी पिकाचे होणारे नुकसान लक्षात घेता, वीज वितरण कंपनीने तातडीने दुरुस्ती करण्याच मागणी शेतक-यांकडून होत आहे.

## चांदूर बाजार येथील ब्रिटिश कालीन जि.प.बांधकाम शाखा अभियंता कार्यालयच बंद करण्याचा डाव

### चांदूर बाजार जि.प.बांधकाम शाखा कार्यालयावर पांढरा पट्टा मारणारा अधिकारी कोण?

#### मुख्यकार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा उपविभाग अभियंता व शाखा अभियंता नितीन झगडे यांच्या वर कारवाई करणार काय ?

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार:-**चांदूर बाजार तहसिल कार्यालयातील ईमारतीच्या डाव्या बाजुला चांदूर बाजार येथील ब्रिटिश कालीन पासून असलेले जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग अचलपूर यांचे चांदूर बाजार शाखा अभियंता कार्यालय होते.याच कार्यालयात अनेक बांधकाम विभागाच्या शाखा अभियंताचा कार्यकाळ गेला त्यांनी चांदूर बाजार शाखा कार्यालयात बसूनच आपले कामकाज केले.चांदूर बाजार तहसिल कार्यालयात असलेले जि.प.बांधकाम शाखा चांदूर बाजारचे सहा दिवस पण कार्यालय बंद असते येथे शाखा अभियंता नितीन झगडे हे आहे. तर आसेगांव सर्कल विशाल मुंदाणे यांच्याकडे तर करजगाव सर्कल राजेश वानखडे कडे असल्याची माहिती अचलपूर उपविभाग जि.प.बांधकाम कार्यालयातील सुत्रानी दिली.हे शाखा अभियंता कार्यालय नेहमीच कुलुप बंदच असते .या कार्यालयातील कार्यरत शाखा अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग अचलपूर कार्यालयातून चांदूर बाजार शाखेचा कारभार चालवतात यांच्या अखत्यारित येणार्या गावातील कामे हे मोठ्या प्रमाणात निकृष्ठ दर्जाची केल्या जात आहे असे नागरीक बोलू लागले आहे.तसेच शाखा अभियंता हे मुख्यालयी राहत नसल्याचे दिसून येते. आहे

चांदूर बाजार येथील जि.प.बां. शाखा कार्यालय असून त्याच्या नावा वरच चक्क पांढरा पट्टा मारून नावच खोडण्यात आले. सदर कार्यालय बंद करण्याचा डाव नितीन झगडे यांनी स्वत:च्या स्वार्था पोटी रचला असल्याची चर्चा नागरिकात आहे याची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी आता नागरीक करीत आहे.सदर प्रकरणाची चौकशी करून जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी अविश्यांत पंड्या कारवाई करणार काय? याकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे.याच चांदूर बाजार जि.प.बां. शाखा कार्यालय मागे रेस्टहाऊस आहे.येथे या कडे देखरेख ठेवण्यासाठी एका कर्मचार्याची नेमणूक केली आहे.सदर कर्मचारी यांना शाखा कार्यालया बाबत विचारणा केली तर हे कार्यालय कुलूप बंदच असते या कार्यालयाचा कारभार अचलपूर उपविभाग कार्यालयातून चालतो अशी माहीती मिळाली. ब्राम्हणवाडा थडी येथील दक्ष नागरीक विलास खाजोने हे जि.प.बां.शाखा चांदूर बाजार कार्यालयात ब्राम्हणवाडा थडी येथील कामकाजा संदर्भात माहिती साठी गेले असता त्यांना शाखा कार्यालय इमारत दिसली पण त्या इमारतीवर कार्यालयाचे नावच दिसले नाही अशी माहिती त्यांनी दिली.तात्काळ या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.-



# १०२ खंजीर, देशी कट्टे जप्त; अवैध शस्त्रसाठ्याविरुद्ध मोठी कारवाई

**दि१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** नागपूरलगतच्या गोरेवाडा जंगलात १५६ जीवंत काडतुसे आढळल्याची घटना ताजी असताना अमरावती शहरातील नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतून तब्बल १०२ खंजीर, चायना चाकू व दोन देशी कट्टे असा प्रचंड मोठा अवैध शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. शहर पोलिसांच्या क्राईम युनिट दोनने १० डिसेंबर रोजी ही दमदार कारवाई केली.

याप्रकरणी टोळीप्रमुखांसह सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. अलिमनगर ते लालखडी रोडवर ९ डिसेंबर रोजी काहीजण चाकूसारखे खंजीर हातात घेऊन दहशत माजवत असल्याच्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. अटक आरोपींमध्ये अब्दुल सोहेल अब्दुल शफी (१९, रा. गुलिस्ता नगर), टोळी प्रमुख अकरम खान उर्फ गुड्डू वल्द बादुल्ला खान (१९, रा. अलिम नगर, कब्रस्तान रोड) याच्यासह फरदीन खान युसूफ खान (२१, राहुल नगर), मुजम्मिल खान जफर खान (२१, रा. गुलिस्ता नगर), शेख सुफियान मोहम्मद अशफाक (१९, रा. यास्मीन नगर) व जाहेद शहा हमीद शहा (२०, लालखडी) यांचा समावेश आहे. सहाही जण अमरावतीतील रहिवासी आहेत. आपण ती शस्त्रे मुंबईहून मागवून शहरातील गुन्हेगारांना त्या अवैध शस्त्रांचा पुरवठा करत असल्याची कबुली त्या सहा जणांनी दिली आहे. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात क्राईम युनिट दोनचे प्रमुख तथा पोलिस निरीक्षक राहुलकुमार आठवले यांच्या पथकाने ही कारवाई केली. आरोपींकडून आणखी शस्त्रे जप्त होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

### राज्यातील सर्वात मोठी कारवाई

राज्यातील सर्वात मोठी अवैध शस्त्र जप्तीची ही कारवाई असल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले. अटकेतील युवकांनी आतापर्यंत । कोणकोणत्या गुन्हेगारांना शस्त्रे विकली त्यांची



माहिती दिली आहे. त्यामुळे भरपुर शस्त्रसाठा जप्त होण्याची शक्यता आहे.

### कलर बॉक्सअन्य गुन्हेगार रडावर

अटकेतील आरोपींचे कुठलेही राजकीय संबंध नाही. ते सर्व मजुरी करणारे आहेत. आतापर्यंत त्यांनी कोणाकोणाला चाकू विकले आणि कोणी नव्याने शस्त्राच्या ऑर्डर दिल्या आहेत, त्यांची माहिती मिळाली असून पथक त्यांच्या शोधात आहे. खोलापुरीगेट ठाण्याच्या हद्दीत रविवारी झालेल्या घटनेत यांनीच विक्री केलेला चाकूचा वापर करण्यात आला का याबाबत सुध्दा चौकशी करीत आहे, असे सांगत आयुक्तांनी युनिट दोनच्या पथकाच्या कामगिरीची प्रशंसा केली.

### अकरम खान बोलावितो शस्त्रे

अकरम खान उर्फ गुड्डू मुंबई किंवा मध्यप्रदेशातून बसने किंवा रेल्वेने शस्त्रे बोलावितो आणि पाच साथीदाराच्या मदतीने विक्री करतो. आतापर्यंत त्याने शहरातील २० । ते २५ गुन्हेगारांना घातक शस्त्रे विकली असून पोलीस त्यांच्या शोधात आहेत.

### चायना चाकूला जास्त मागणी

जप्त केलेल्या शस्त्रामध्ये सर्वाधिक चायना चाकू आहेत. त्यामध्ये लहान-मोठे, बटनचा चाकू तसेच अंधारात लाईट लागणारे चाकू आहेत. चाकूचे नवीन प्रकार दिसल्याने पोलीस आयुक्तांनी स्वतः सर्व चाकूंची पाहणी व माहिती घेतली

# आराधना शोरूम, प्रतिष्ठानवर जीएसटी विभागाची धाड

## कपडा व्यावसायीकांमध्ये खळबळ

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** शहरातील आराधना शो रूम व प्रतिष्ठानवर जीएसटी विभागाच्या पथकाच्या सुमारे ५० अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सोमवारी दुपारी एकाचवेळी धाड टाकली.त्यामुळे कपडा व्यावसायीकांमध्ये चांगलीच खळबळ माजली होती.

या कारवाईदरम्यान पथकाने काही महत्वाचे कागदपत्रांची पाहणी केली. अमरावती शहरात नावारुपास आलेल्या या नामांकित प्रतिष्ठानावर एकाचवेळी घर दुकान व ऑफिसमध्ये धाड टाकल्यामुळे व्यावसायिकांत चांगलीच खळबळ उडाल्याचे दिसून आले. जयस्तंभ चौक ते जवाहरगेट मार्गावरील आराधना शोरूमवर जीएसटीची धाड पडल्याचे कळताच काहीव्यापाऱ्यांनी




आपापले दूत पाठवून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. ही धाड नियमित कारवाईचा भाग होता की विशेष माहितीवरून वा करचोरीवरून घालण्यात आली. त्याचा उलगडा तूर्त होऊ शकला नाही. त्यामुळे कारवाईविषयी तर्कवितर्क लावले जात होते. आराधना शोरूमचेमालक काही वर्षापासून रियल इस्टेट व बांधकाम व्यवसायात आहे. तसेच शहरालगतच्या बऱ्याच जमीन त्यांनी विकत घेतल्या आहेत. त्यातून ही धाड घालण्यात आली, अशी चर्चा कपडा व्यापाऱ्यात आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत संपर्क होऊ शकला नाही.

# मोदींच्या मेक इन इंडियामध्ये कांदा बसत नाही का?

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून बच्चू कडू संतापले

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर-** सरकारने धोरणाने शेतकऱ्यांना मारले. सत्ता बदलते, मात्र शेतकऱ्यांच्या स्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. जाती, धर्मांच्या चर्चेत लोकांना गुंतवून ठेवले. पेट्रोल, डिझेलचे दर वाढले. खर्च दुप्पट होत आहे. असे असतानाही सरकार शेतकऱ्यांसाठी चुकीच्या योजना आणत आहेत. पंतप्रधान मोदींच्या मेक इन इंडियामध्ये कांदा बसत नाही का? असा सवाल आमदार बच्चू कडू यांनी विचारत सरकारच्या धोरणांवर टीकास्त्र सोडले.राज्यातील शेतकऱ्यांवर आलेल्या संकटावर अल्पकालीन चर्चेदरम्यान बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर सरकारचे लक्ष वेधले. केंद्राने कापसाचे ६ हजार भावजाहीर केले. ८ हजार ८८६ दर मिळाला तर १५ टक्के नफा मिळतो. नफा न घेता माल विकावा लागत आहे. इतर पिकांचीही हीच स्थिती आहे.तिकीट मागण्यासाठी जावे



लागत असल्याने आमदार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना सोईची भूमिका घेतात, असे म्हणत इतर आमदारांवरही त्यांनी टीका केली. 'मी पक्षासोबत बेईमानी करेल, मात्र शेतकरी या माझ्या बापासोबत करणार नाही', असे म्हणत बच्चू कडू यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. ५ लाखांच्या बजेटमध्ये शेतकऱ्यांच्या वाट्याला केवळ २३ हजार कोटी आले. बजेटमध्ये शेतकऱ्यांचे स्थान नगण्य आहे. शेतकऱ्यांच्या संख्येनुसार बजेटमध्ये भागीदारी द्या. कोणत्याच पक्षात ही धमक नाही. सर्वात जास्त रोजगार देणारे क्षेत्र असूनही शेतकरी दुर्लक्षित आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

# विभागीय लोकशाही दिनात १९ प्रकरणांवर सुनावणी

## प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा करा -विभागीय आयुक्त

**दि१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, -** नागरिकांकडून प्राप्त तक्रार अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा करण्यात यावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी संबंधित विभागांना आज येथे दिले. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. त्यावेळी त्या बोलत होत्या. लोकशाही दिनात एकूण १९ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी तक्रारदारांचे म्हणने ऐकुण घेतले. तसेच प्रकरणांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिल्या.

उपायुक्त संजय पवार, कृषी सहआयुक्त किसन मुळे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह महसूल, पोलीस, कृषी, महापालिका, सहकार, महिला व बालविकास, समाजकल्याण व ऊर्जा विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# नझूल पट्टेधारकांनी कराचा भरणा ३१ डिसेंबरपूर्वी करावा

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताकअमरावती:** नझूल पट्टेधारकांनी कर व थकबाकीचा भरणा ३१ डिसेंबरपूर्वी करावा, अन्यथा जमीन महसूल अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा भूमी अभिलेख उपअधिक्षक अनिल फुलझेले यांनी दिला आहे.

शहरात अनेक नझूल पट्टेधारक आहेत. त्यांनी दरवर्षी कराचा भरणा नियमित करणे आवश्यक आहे. तथापि, नझूल पट्टे धारकांनी एकूण रक्कम १ कोटी ३९ लक्ष ६ हजार ७०८ रुपयांचा अद्यापही नझूल कर भरलेला नाही. भूमी अभिलेख कार्यालयाने वारंवार सूचना करूनही अनेकांनी कराची रक्कम भरली नाही. या बाबीची गंभीर दखल घेण्यात आली आहे.संबंधित पट्टेधारकांनी ३१ डिसेंबरपूर्वी कर न दिल्यास थकित नझूल करवसुलीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार नझूल भाडेपट्टा रद्द करुन नझूल मिळकत शासनजमा करण्याची कार्यवाही करण्याचा इशारा फुलझेले यांनी दिला आहे.

# बहिरम यात्रेवर राहणार ३२ सीसीटीव्ही कॅमेरांची नजर

### एका व्यक्तीला मिळणार एकच प्लॉट

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताकचांदुर बाजार -** जानेवारीपर्यंत चालणाऱ्या बहिरमयात्रेवर ३२ सीसीटीव्ही कॅमे-याची राहणार यात्रेदरम्यान आहे.लागणाऱ्या दुकानांसह नजर अन्य उपक्रमांकरिता एकूण ६७० प्लॉट्स निर्धारित केले आहेत प्लॉट्सचा जाहीर हर्रास सोमवार, मंगळवार, बुधवारला



बुधवारला होत आहे. यात सिनेमा टॉकीज, सर्कस, मौत का कुडा, झुले, आनंद मेळा, दिव्यांग आणि बचत गटाकरिता स्वतंत्र प्लॉट्स राखीव ठेवण्यात आले आहेत,

### दोन कंट्रोल युनिट-

यात्रेवर नजर ठेवणाऱ्या ३२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या अनुषंगाने दोन कंट्रोल युनिट उभारल्या जाणार आहेत. यातील एक पोलिस चौकी समोरील यात्रा कार्यालयात तर दुसरे कारंजा बहिरम रोडवरील ग्रामपंचायत भवनात राहणार आहे.

**पोट भाडेकरू-** प्लॉटचा हर्रास घेणाऱ्यास पोट भाडेकरू ठेवता येत नाही. मागील वर्षी जाहीर लिलाव पद्धतीतून एकापेक्षा अधिक प्लॉट अडकवून मग ते प्लॉट्स गरजूंना जादा भावात विकल्या गेलेत. प्लॉट घेणाऱ्यांच्या जागेवर दुसऱ्यांनीच आपली दुकाने थाटली होती

यात्रेदरम्यान रुग्णवाहिकेसह फायर ब्रिगेड सज्ज ठेवण्याचे निर्देश पोलिसानी यात्रा व्यवस्थापकांना दिले आहेत.

# दुकानांचे नामफलक मराठीत बंधनकारक

## कामगार उपआयुक्तांची आस्थापनाधारकांना सतर्कतेची सूचना

**दि१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियमांतर्गत सर्व व्यावसायिक दुकान आणि आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेमध्ये लावण्याबाबतची अधिसूचना शासनाने निर्गमित केली आहे. त्याची दुकानदारांनी अंमलबजावणी करण्याचे आवाहन उपआयुक्त यांनी केले आहे.अधिसूचनेनुसार जिल्ह्यातीलसर्व दुकाने व आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेमध्ये ठळकअक्षरात दर्शनी भागात लावणे, बंधनकारक आहे. मराठी भाषेतील नामफलक इतर भाषेत असलेल्या नामफलकापेक्षा मोठ्या व




ठळक अक्षरात असावे. तसेच ज्या आस्थापनामध्ये मद्य पुरविल्या किंवा विकले जाते, अशा आस्थापनाधारक नामफलकावर महान व्यक्ती किंवा गडकिल्यांची नावे लिहणार नाही. आस्थापनाधारक आस्थापनेचे नामफलक मराठी - भाषेमध्ये दर्शनी भागावर लावणार नाहीत, त्या आस्थापना मालकावर अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे कामगार उप आयुक्तांनी म्हटले आहे.

# रामभक्तांसाठी आनंदाची बातमी, रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात मिळणार आरोग्य सुविधा!

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या -** उत्तर प्रदेशातील अयोध्येत राम मंदिराच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. पुढील वर्षात म्हणजेच २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामजन्मभूमीवर उभारण्यात येत असलेल्या भव्य राम मंदिरात रामललाच्या प्राणप्रतिष्ठेच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत प्राणप्रतिष्ठेनिमित्त लाखो भाविक अयोध्येत दाखल होणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे भाविकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्याचे कामही प्रशासन करत आहे.

दरम्यान, रामललाच्या प्राणप्रतिष्ठेच्या प्रसंगी अयोध्येत येणाऱ्या भाविकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य विभाग पूर्ण तयारी करत आहे. याचबरोबर, श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्यावतीने देशभरातील वैद्यकीय महाविद्यालये आणि खाजगी क्षेत्रातील डॉक्टरांना स्वयंसेवीसाठी गुगल फॉर्म भरण्याचे काम सुरू आहे. श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने या कामाची जबाबदारी राजर्षी दशरथ मेडिकल कॉलेज आणि ट्रस्टचे वैद्यकीय समन्वयक डॉ. पीयूष गुप्ता यांच्याकडे सोपवली आहे.

डॉ. पीयूष गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार, राम मंदिरातील रामललाच्या प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमादरम्यान केवळ राज्यातीलच नव्हे तर देशभरातील डॉक्टरांनी भाविकांना चांगल्या आरोग्य सुविधा देण्यासाठी अर्ज केले आहेत. तसेच, गुगल फॉर्मची लिंक नॅशनल मेडिकल ऑर्गनायझेशन (छचज) आणि आरोग्य भारती मार्फत पाठवली जात आहे. हे ओपन केल्यानंतर फॉर्म भरता येईल, असे डॉ. पीयूष गुप्ता यांनी सांगितले. याचबरोबर, या आरोग्य सेवेसाठी दिल्लीतील एम्ससह चंदीगड आणि उत्तर प्रदेशातील अनेक डॉक्टरांकडून अर्ज आले आहेत. १५ डिसेंबरनंतर सर्व अर्जांची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांचे नाव, पदवी, निवासस्थान आणि राज्याची पडताळणी केली जाईल. तसेच, पाससह क्यूआर कोड जारी केला जाईल, असे डॉ.




पीयूष गुप्ता यांनी सांगितले. तर वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेंद्र कुमार यांनी सांगितले की, ट्रस्टने त्यांना अयोध्येत येणाऱ्या या डॉक्टरांच्या निवासाची व्यवस्था करण्यास सांगितले आहे.

# भाजप शहर अध्यक्ष आ.प्रवीण पोटे पाटीलच्या नेतृत्वात व्युवरचना तयार

## लोकसभा,विधानसभा,मनपा निवडणुकीत भाजपची तयारी जोरदार

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड विधानसभा निवडणुकीतील विजयाने रिजार्च झालेल्या भाजपने आता आगामी लोकसभेसह विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची अगदी स्थानिक पातळीपासून जोरात तयारी सुरु केली आहे. या अनुषंगाने भाजपचे शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांनी सुद्धा कंबर कसली असून अभेद्य अशी व्युहरचना आखणे सुरु केले आहे. विशेष म्हणजे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह वैयक्तीक टिम यासाठी मैदानात उतरविली आहे. या चक्र व्युहात शहर भाजपला हुकमी विजयी उमेदवार म्हणून परीचित असलेले अनेक दिग्गज प्राप्त झाल्याची विश्वसनीय सूत्राची माहिती असूनयेत्या काळात अनेक जण भाजपच्या तंबुत दिसणार आहेत.

भाजपचे शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांनी भाजपा शहर सरचिटणीस चेतन पवार आणि विवेक कलोती यांच्यासह कार्यकारिणीतील सर्वच पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेत जोरदार तयारी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गेल्या लोकसभा निवडणुकीत मैदानात उतरलेले डॉ. राजीव जामठे हे लवकरच भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे



लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून डॉ. राजीव जामठे यांचे नाव ऐन वेळेवर समोर येऊन जोर का झटका देण्याचे काम आतमधून सुरु असल्याची माहितीआहे. याचं सोबतीला आणखी सिद्धार्थ वानखडे यांच्या नावाची सुद्धा चर्चा आहे. दुसरीकडे नवनित राणा सुद्धा भाजप समर्थित उमेदवार म्हणून निवडणूक मैदानात उतरणार हे निश्चित असताना ऐन वेळी कोणत्याही आपातकालीन स्थितीचा सामना करण्यासाठी पक्षाने तयारी करून ठेवली आहे.

एवढेच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका सपना ठाकुर, पहिले काँग्रेस, त्यानंतर राकाँचे नेते माजी नगरसेवक रतन डेंडुले सुद्धा भाजपच्या वाटेवर असून लवकरच भाजपात प्रवेश करणार आहे. सोबतच विद्यापीठ परीसरातील एक माजी - नगरसेविका सुद्धा भाजपच्या वाटेवर असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. - विशेष म्हणजे शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांनी आयोजित केलेल्या दिवाली मिलन कार्यक्रमात - याबाबत जोरदार चर्चा होती.

पन्ना प्रमुख ते केंद्र प्रमुख टाईट फिल्डीग विशेष म्हणजे भाजपने शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांच्या नेतृत्वातनेतृत्वात शहरामध्ये आगामी लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकीची जोरात तयारी सुरु केली आहे. यासाठी पन्ना प्रमुख, बुथ प्रमुख, केंद्र प्रमुख, शक्ती प्रमुख, ब्लॉक प्रमुख, विभाग प्रमुख आदींची एक व्यवस्था निर्माण करून मतदार यादीतील एक-एका पानावरील मतदारांचा शोध घेत त्याच्यापर्यंच पोहचण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे भाजपच्या पदाधिकाऱ्यांसोबत आ. पोटे यांनी स्वतःची सुद्धा एक टिम तयार केली असून संपूर्ण शहरात ॲक्टिव आहे. या सर्वाची व्युवरचना तयार करीत फिल्डीग लावली. सोबतच महिला मोर्चा, ओबीसी, युवा ओबीसी, युवा मोर्चा, अनु.जाती जमाती मोर्चा, किसान मोर्चा सर्वच तयारीला लागले आहे. तर त्याच वेळी विरोधी मात्र मोर्चे आणि आंदोलनाच्या गोतावळ्यात अडकल्याने आगामी निवडणुकीत भाजपाचे पारडे जड असून भाजप सहजरित्या आगामी निवडणुकीमध्ये बाजी मारेल यात काही शंका नाही.

# विधानभवनावर हजारो प्राथमिक शिक्षकांचा आक्रोश

## विद्यार्थ्यांना शिकू द्या,शिक्षकांना शिकवू द्या.....या घोषणेने नागपूर शहर दणाणले : प्राथमिक शिक्षक समितीचा मोर्चा

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना दैनंदिन अध्यापनाच्या कामापासून दूर ठेवणाऱ्या नानाविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडथळे निर्माण होत आहे. त्यामुळे- शिक्षकांना शिकवू द्या..! विद्यार्थ्यांना शिकू द्या..!! अशाप्रकारची कर्तव्य निर्वहनाची आर्त मागणी आम्ही शिक्षक सातत्याने शासनाकडे करीत आहोत.राज्यात जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांत सेवारत शिक्षकांच्या अनेक न्यायसंगत मागण्या प्रदीर्घकाळ प्रलंबित आहेत.या करीता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सोमवार ११डिसेंबरला हजारो शिक्षकांचा आक्रोश मोर्चा



नागपूर विधान भवनावर काढला होता.विविध प्रलंबित मागण्यांच्या घोषणांनी नागपूर शहर दणानुन गेले होते.हा भव्य मोर्चा यशवंत स्टेडीअम येथुन विधान भवनावर धडकला येथे मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले मोर्चाला विविध आमदार,शिक्षक आमदार यांनी भेट दिली.शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाने ना.दिपक केसरकर,शालेय शिक्षणमंत्री यांना मागण्याचे निवेदन सादर केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, शिक्षक नेते उदय शिंदे,काळुजी बोरसे पाटिल, सुधाकर सावंत,सौ.वर्षा केनवडे, राजेन्द्र पाटिल, लिलाधर ठाकरे यांनी मोर्चाचे नेतृत्व केले,यावेळी राज्य कार्यकारीणी पदाधिकारी विजयकुमार पंडीत, महादेव पाटिल माळवदकर,राजन सावंत,आनंदा कांदळकर, विलास कंटेकुरे, सयाजी पाटिल,नंदकुमार होळकर,राजेन्द्र खेडकर,सुरेश पाटिल,किशोर पाटिल,सतिश सागळे,किशन बिरादार,नितीन नवले,राजेश सावरकर,पंडीत नागरगोजे,प्रफुल्ल पुंडकर,सैय्यद शफीक अली,विभागीय,जिल्हा आणि तालुका पदाधिकारी, शिक्षक समितीचे सदस्य यांनी केले.भविष्यात याही पेक्षा मोठे आंदोलन उभारण्याची घोषणा यावेळी करण्यात आली.असे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# मुलींच्या सक्षमीकरणासाठी ‘लेक लाडकी’ योजना

**अरुण जोशी**

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे, मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी यासह मुलींचा मृत्यूदर कमी करणे व बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे व शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणणे यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना सुरू केली आहे. पात्र, लाभार्थ्यांनी अटी व शर्तीच्या अधीन राहून या योजनेचा लाभ घ्यावा, असे प आवाहन जिल्हा परिषदेच्या ज महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात येत आहे.पूर्वीची माझी कन्या भाग्यश्रीयोजना (सुधारीत) ही योजना आता लेक लाडकी




योजनाम्हणून नव्या स्वरूपात १ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या मुलींसाठी लागू करण्यात येत आहे. ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये १ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या मुलींसाठी लागू करण्यात आली आहे. ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये १ एप्रिल रोजी किंवा त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक किंवा दोन मुलींना लागू राहील. तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.

### योजनेंतर्गत देय लाभ

पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात मुलीच्या जन्मानंतर पाच हजार रुपये, इयत्ता पहिलीत सहा हजार रुपये, सहावीत सात हजार रुपये, अकरावीत आठ हजार रुपये तर, लाभार्थी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकूण रुपये एक लाख एक हजार एवढी रक्कम देण्यात येईल.

पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवेळी माता / पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असणार आहे.तसेच दुसऱ्याप्रसूतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र, त्यानंर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

१ एप्रिल २०२३ पूर्वी एक मुलगी, मुलगा आहे व त्यानंतर जन्माला आलेल्या दुसऱ्या मुलीस किंवा जुळ्या मुलींना स्वतंत्रपणे ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र माता, पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.अश्या अटी व शर्ती या योजने करिता लागू राहील.

# से.फ.ला. हायस्कूलचे कला शिक्षक अजय जिरापुरे राज्यस्तरीय कला प्रतिभा पुरस्काराने सन्मानित

## प्रतिभावंताचे १४ वे राज्यस्तरीय चित्रांगण साहित्य संमेलन थाटात संपन्न

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे**

दिनांक - ९ व १० डिसेंबर रोजी चिखलदरा येथे नगर पालिका सभागृहात प्रतिभा साहित्य संघ, महाराष्ट्र यांचे १४ वे राज्यस्तरीय चित्रांगण साहित्य कला संमेलन अत्यंत उत्साहात पार पडले. आगळेवेगळे यासाठी की या संमेलनात साहित्यिकांसोबतच विविध कलेत पारंगत असलेल्या कलाकारांचा सहभाग व त्यांना जाहीर झालेले पुरस्कार, संमेलनस्थळी असलेले चित्र प्रदर्शन त्याची साथ देत होते.. पहिल्या दिवशी दिनांक- ९ डिसेंबर धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित सेठ फत्तेलाल लाभचंद हायस्कूलचे कला शिक्षक अजय जिरापुरे यांनी कित्येकांच्या उपस्थितीत वैराग्यमूर्ती, स्वछता दूत गाडगेबाबा यांचे रंगीत खडुच्या माध्यमातुन फालकावर रेखाटनाचे प्रात्यक्षिक दिले. हे गाडगेबाबांचे रेखाटन अगदी सुरवातीच्या हॉलच्या प्रवेशद्वारापासून सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमाचे



उदघाट्क सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार तथा साहित्यिक गजानन घोंगडे, संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध चित्रकार व साहित्यिक सुनील यावलीकर व प्रमुख उपस्थिती सिने अभिनेते भारत गणेशपुरे तसेच कित्येक उपस्थित मान्यवरांनी अजय जिरापुरे यांच्या फलक रेखाटनाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. एवढेच नाही तर भारत गणेशपुरे यांनी अजय जिरापुरे यांना अभिनंदन पत्र त्यांच्या स्वअक्षरात, स्वाक्षरीसह लिहून भेट दिले. या फलक रेखाटनाच्या प्रात्यक्षिकाबद्दल अजय जिरापुरे यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.दिनांक - १० डिसेंबर दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाच्या स्थळी काही कलावंताचे चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या चित्रप्रदर्शनेचे उद्घाटक गजानन घोंगडे यांच्या हस्ते निमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीत चित्रप्रदर्शनीचे उद्घघाटन करण्यात आले. काही कलाकारांच्या चित्र प्रदर्शनीमध्ये अजय जिरापुरे यांचे पेनवर्क चित्रशैली, फलक रेखाटनाचे कित्येक फोटो, रांगोळीचे फोटो यांचे चित्र प्रदर्शन भरवण्यात आले होते आणि ते सर्व चित्र बघणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होते.कला शिक्षक अजय जिरापूरे यांना जेष्ठ चित्रकार विजय राऊत व विदर्भ कला शिक्षक संघाचे अध्यक्ष विनोद इंगोले यांच्या हस्ते राज्यस्तरीय कला प्रतिभा पुरस्काराने सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या बदलीचे संकेत

**दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

हिवाळी अधिवेशनादरम्यान राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे वारे वाहत आहे. ठाण्याच्या पोलीस आयुक्तपदी आशूतोष डुंबरे यांची बदली करण्यात आली तर गेल्या दीड वर्षांपासून रिक्त असलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस महासंचालक पदावर जयजीत सिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आता नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याही बदलीचे संकेत मिळत असून अधिवेशनाच्या अखेरीस त्यांची



बदली होण्याची चर्चा आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून ठाणे पोलीस आयुक्तालयात नवे आयुक्त नियुक्तीच्या चर्चा सुरु असतानाच गृह विभागाने सोमवारी ठाणे पोलीस आयुक्त जयजीत सिंह यांची बदली केली व त्यांच्या जागी आशुतोष डुंबरे यांची नियुक्ती केली आहे.

### अनूप कुमार यांच्या नावाची चर्चा

अनूप कुमार यांच्या नावाची नागपूर पोलीस आयुक्तपदासाठी चर्चा आहे. त्यांना नागपुरात काम करण्याचा अनुभवसुद्धा आहे. अमितेश कुमार यांची बदली झाल्यास त्यांच्या जागी अपर पोलीस महासंचालक संजय सक्सेना, वायरलेस विभागाचे अपर पोलीस महासंचालक असलेले सुनील रामानंद, सुरेशकुमार मेखला, आस्थापना विभागाचे संजीव सिंघल यांच्या नावांची देखील चर्चा आहे.

आता राज्यातील इतरही काही आयुक्तांची बदली होण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. विधीमंडळ अधिवेशन संपल्यानंतर ही घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार हे सप्टेंबर २०२० रोजी नागपुरात रुजू झाले होते. नागपूरच्या इतिहासात सर्वाधिक काळ पोलीस आयुक्तपदी राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. मात्र आता त्यांची बदली होणार असल्याची चर्चा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्ये आहे. त्यांच्या जागी आता नागपूर पोलीस आयुक्तपदाची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याला देण्यात येणार याबाबत चर्चांना ऊत आला आहे.

उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृहशहर असलेल्या नागपुरात येणाऱ्या नवीन अधिकाऱ्यावर मोठी जबाबदारी राहणार आहे. गृह विभागाकडून नागपूरसोबतच पिंपरी चिंचवड, नवी मुंबई येथील आयुक्तांच्या बदल्यांचीदेखील तयारी सुरू झाली आहे. याबाबत अधिकाऱ्यांच्या नावाची चाचपणीदेखील झाली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. याशिवाय काही शहरांतील सहपोलीस आयुक्त व इतर महत्त्वाच्या पदीदेखील नवीन अधिकारी मिळणार आहेत.

# मंगरूळ चव्हाळा येथे एसटी बसमधून डिझेल चोरी

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर**

मंगरूळ चव्हाळा येथे रात्री मुक्कामी असलेल्या एसटी बसमधून डिझेल चोरी केल्याची घटना घडली. त्यामुळे याबाबतची तक्रार चालकाने पोलिस स्टेशनला दाखल केली असून अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगरूळ चव्हाळा येथे जेथून चोरी झाली त्या हाकेच्या अंतरावर पोलीस स्टेशन आहे. असे असतांनासुद्धा चोरट्यांनी बसमधून डिझेल चोरी केल्याने गावात खळबळ उडाली आहे. अलीकडे मंगरूळ चव्हाळा परिसरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मंगरूळ चवाळा हे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सवांत मोठे गाव आह. अशा घटना घडल्या तर मंगरूळ चवाळा येथे येणारी मुक्कामी एसटी बस गावात येणार नाही अशी प्रतिक्रिया उमटत आहे. पोलीस प्रशासन यांनी गेल्या काही दिवसापासून रात्री मंगरूळ चवाळा येथे पेट्रोलिग बंद केली आहे, ती पुन्हा सुरु करावी, अशी मागणी गावकरी करीत आहे.

# विद्यार्थांनी उलगडले भारतीय भाषेचे सौंदर्य : आयआयएमसीत भारतीय भाषा दिवस साजरा

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय भाषा दिनानिमित्त आयआयएमसी पत्रकारितेच्या विद्यार्थांनी मराठी, हिंदी, गुजराथी, मैथिली, ओडिया, अवधी, मागधी, बंगाली, भोजपुरी, कुमाओनी (उत्तराखंड) छत्तीसगडी या विविध भाषेत कलागुण सादर करून भारतीय भाषेतील सौंदर्य उलगडले. भारतीय जन संचार संस्थानच्या पश्चिम क्षेत्रीय केंद्रात भारतीय भाषा दिनानिमित्य सोमवार ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता ‘भारतीय भाषा उत्सव’ साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थांनी वेगवेगळ्या भाषेत कविता, गीत, भजन व लघु कथा सादर करून आपल्या भाषेचा परिचय दिला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राममनोहर लोहिया अवध विश्वविद्यालय अयोध्याचे डॉ. विजयेन्दु चतुर्वेदी होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थानचे प्रादेशिक संचालक डॉ. राजेशसिंह कुशवाहा होते. यावेळी डॉ. विनोद निताळे, चैतन्य कायंदेपाटिल, संजय पाखोडे उपस्थित होते.



डॉ. चतुर्वेदी म्हणाले, संस्कृती संवर्धन आणि संरक्षणात भाषेचे विशेष योगदान आहे. खपवळरप ङरपसीरसश ऊरू भारतातील बहू भाषिकता ही समस्या नसून रोजगाराच्या अनुषंगाने मोठी संधी आहे. पत्रकारितेचा विद्यार्थांनी ही संधी ओळखून स्वभाषेसह अन्य काही भाषांवर प्रभुत्व मिळविल्यास रोजगाराचे मोठे दालन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भारतीय भाषांचा अभ्यास व सराव विद्यार्थांनी करावा असा संदेशही त्यांनी यावेळी दिला. सुरुवातीला हिंदी पत्रकारितेच्या विद्यार्थांनी मैथिली भाषेतील राम विवाह गीत सादर केले. त्यानंतर मराठी पत्रकारितेचा विद्यार्थांनी 'काळ्या मातीत मातीत तिफण चालते' हे गीत सादर केले.

तदनंतर ओडिया भाषेत जगन्नाथाचे भजन व सीमेवर तैनात जवानांवर आधारित गीत इंग्रजी पत्रकारितेच्या विद्यार्थांनी सादर केले. कविता, लघुकथा, चारोळी आणि गीतांचा माध्यमातून विद्यार्थांनी आपल्या कलागुणांचा अविष्कार सादर केला. कार्यक्रमाचे संचालन कुशल, पल्लवी आणि रागिणी यांनी केले. प्रास्ताविक डॉ. विनोद निताळे यांनी केले. पाहुण्याचा परिचय शुभी हिने सांगितला तर आभार रिषिका या विद्यार्थिनीने मानले. याप्रसंगी संस्थानचे कोमल झंगळे, नुरूझुमा शेख, भूषण मोहोकार, अनंत नांदुरकर, पंकज निखार यांच्यासह मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा; सरकारनं माहिती लपवल्याचा आरोप

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

हिवाळी अधिवेशनाच्या काळात आणखी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्य मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे हा राजीनामा ४ डिसेंबरला दिला आणि ९ डिसेंबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तो स्वीकारला. मात्र याबाबत सरकारने कुठलीही माहिती सभागृहात दिली नाही असा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.



माजी न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी ४ डिसेंबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून राजीनामा दिला.त्यात राजीनाम्याचे कुठलेही कारण नाही. परंतु राज्य मागासवर्गीय आयोगावर दबाव असल्याचे बोलले जात आहे. याआधी आयोगाच्या इतर सदस्यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर आता अध्यक्ष निरगुडे यांनी राजीनामा दिल्याने विरोधकांनी हा प्रश्न लावून धरला आहे. एकीकडे मराठा आरक्षणासाठी सरकारने क्युरेटिव्ह पिटिशन सुप्रीम कोर्टात दाखल केली आहे. त्यात मराठा समाजाचे मागासलेले पण सिद्ध करावे लागणार आहे. परंतु मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांपासून सदस्यांचे राजीनामे आल्याने यामागे नेमके काय सुरू आहे असा प्रश्न उभा राहिला आहे.

याबाबत विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्य मागास वर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती आनंद निरगुडे यांनी ४ डिसेंबर रोजी दिलेला राजीनामा सरकारने ९ डिसेंबरला स्वीकारल्याची धक्कादायक बातमी पुढे आली आहे. राज्य मागास वर्ग आयोगाचे सदस्य एकामागून एक आपला राजीनामा देत आहे. अध्यक्षांनी दिलेला राजीनामा स्वीकारल्याची माहिती सरकारने लपवून ठेवली.विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना याबाबत सरकारने कोणतीही माहिती सभागृहात का सांगितली नाही? सरकारचं नेमकं अस चाललं काय?. राज्य मागासवर्ग आयोगातील सदस्य आणि आता अध्यक्ष का राजीनामा देत आहे याबाबत सरकारने सभागृहात स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, ही बाब अतिशय गंभीर असून एकामागोमाग एक सदस्य राजीनामा देतायेत आणि आता अध्यक्षांनी राजीनामा दिला. आयोगाच्या कामात राजकीय हस्तक्षेप गंभीर आहे.आयोगाचे काम घटनात्मक संस्थेचे आहे. निष्पक्षपणे निर्णय देणे ही जबाबदारी असते. पण या पद्धतीत हस्तक्षेप झाला तर कुठलाही निर्णय निष्पक्ष कसा होईल हा प्रश्न आहे त्यामुळे शासनाने सभागृहात स्पष्ट करावे असं माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सांगितले.

# नांदगाव पेठ एमआयडीसीतील उद्योग वाचवा ॲड. यशोमती ठाकूर यांची सरकारकडे जोरदार मागणी

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

पश्चिम विदर्भामध्ये विशेषतः अमरावती विभागात उद्योगांची गुंतवणूक कमी प्रमाणात होते आहे. जे उद्योग अमरावती विभागात आले आहेत त्यातील उद्योग आता बाहेर जाऊ लागले आहेत, त्यामुळे बाहेर जाणारे हे उद्योग थांबवा, अथवा नवीन उद्योग अमरावती नांदगाव पेठ एमआयडीसीत आणा, अशी जोरदार मागणी अमरावतीच्या काँग्रेस आमदार ड .यशोमती ठाकूर यांनी आज विधानसभेत केली. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ एमआयडीसी मध्ये हरमन फिनोकेम या कंपनीने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली होती. महाविकास आघाडीच्या काळात या कंपनीच्या प्रकल्पाचे भूमिपूजन नांदगाव पेठ एमआयडीसी करण्यात आले. त्यावेळीही काही लोकांनी आपण हा उद्योग आणला असल्याचा डांगोरा पिटण्याचा प्रयत्न केला होता. मात्र महाविकास आघाडीने हा प्रकल्प त्या ठिकाणी राबवण्यासाठी भूमिपूजन केले. सुमारे ११८ एकर परिसरात हा प्रकल्प उभा राहणार होता त्यासाठी अडीच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत होती. शेकडो कामगारांना यातून रोजगार उपलब्ध होणार होता. मात्र, आता हा उद्योग अमरावती बाहेर जात आहे. एडवांटेज विदर्भ च्या माध्यमातून विदर्भात नवीन नवीन उद्योग यावेत यासाठी प्रयत्न करण्यात आला होता त्यानुसार हे उद्योग येत होते. मात्र तरीही नागपूर विभागाच्या तुलनेत अमरावती विभागात येणाऱ्या उद्योगांची संख्या ही अत्यल्पच आहे. असेही ड. ठाकूर यावेळी म्हणाल्या.



नांदगाव पेठ एमआयडीसी मधून उद्योग बाहेर जाण्यामागे नेमकी काय कारणे आहेत? त्यांना कुणी त्रास देतो आहे का? याबाबत सरकारने आणि उद्योग विभागाने चौकशी करायला हवी. नियमाप्रमाणे एखादा उद्योग जर बाहेर जात असेल तर त्या ठिकाणी दुसरा उद्योग तातडीने आणला गेला पाहिजे. मात्र त्या दृष्टीने सरकारकडून काही कार्यवाही होताना दिसत नाही. उद्योग बाहेर गेल्यामुळे नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील शेकडो कामगार बेरोजगार होणार आहेत. सरकारने तातडीने हे उद्योग थांबवावेत, अथवा त्या जागी नवीन उद्योग येतील अधिक गुंतवणूक होईल, यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी ड. यशोमती ठाकूर यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे आज विधानसभेत केली.

# राजकीय हेतूनं मुंबई महापालिकेच्या कामाची चौकशी; आमदार सचिन अहिरांची टीका

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मुंबई महानगरपालिकेच्या मागील २५ वर्षातील अर्थिक व्यवहारांची चौकशी लावणे दुर्दैवी आहे. त्या २५ वर्षांतील २० वर्षे जे आमच्यासोबत होते, तेच आता चौकशीवर चर्चा करताहेत. आगामी निवडणुका लक्षात ठेवून ही चौकशी करण्यात येत आहे. ही कारवाई राजकीय दृष्टीकोनातून आहे, असे शिवसेनेचे (ठाकरे गट) विधान परिषदेचे सदस्य सचिन अहिर विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले. ज्यावेळी मुंबई महापालिकेच्या भ्रष्टाचाराची चौकशी केली जात असताना सत्ताधारी पक्षातील आमदार ठाणे, कल्याणची चौकशी बघताहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आम्ही यापूर्वी लावलेला आहे. त्याची साधी कॅगद्वारे पण चौकशी होत नाहीये. एकीकडे इतर महापालिकेतील भ्रष्टाचारावर कॅगची चौकशी करू द्यायची नाही आणि दुसरीकडे मुंबई महापालिकेची चौकशी करायची, असा प्रकार सुरू आहे. ज्या आयुक्तांच्या कार्यकाळात या सर्व गोष्टी झाल्यात त्यांनाच प्रशासक म्हणून ठेवायचे. पाहिजे त्या गोष्टी करून घ्यायच्या. असलेल्या ठेवीतून शहर स्वच्छ करत असल्याचे दाखवायचे, असा प्रकार सुरू आहे, असे आमदार सचिन अहिर म्हणाले.



**एसआयटीला सामोरे जाणार**

दिशा सालियान प्रकरणी नेमलेल्या एसआयटीद्वारे आदित्य ठाकरेंना बोलाविले जाणार की नाही, याबाबत अधिकृत माहिती नाही. ही चौकशी पारदर्शकपणे होणे असेल तर आम्ही त्याला सामोरे जाऊ. त्यातून काही न झाल्यास न्यायालयात जाण्याचा पर्याय आमच्यापुढे उघडा आहे.

# योग्य वेळ आल्यावर मनपा प्रशासनाकडून अचूक उत्तर मिळेल : डॉ.मेघना वासनकर



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती महानगरपालिका मध्ये येणाऱ्या झोननिहाय सफाई कंत्राटातील तब्बल ४० लक्ष रुपयाचा आर्थिक अपहार झाल्याची तक्रार युवा सेनेचे समन्वयक राहुल माटोडे यांनी कोतोली ठाण्यात काही दिवसांपूर्वी दाखल केली होती.यावर आज महानगरपालिकेच्या उपयुक्त डॉ. मेघना वासनकर यांची बाजू विचारली असता त्यांनी सांगितले की,मनपा प्रशासनाकडून तक्रारकर्त्यांना लवकरच योग्य ते उत्तर मिळेल व सत्य बाजू समोर येईल.झालेले आरोप प्रत्यारोप कितपत सत्य आहे ते योग्य वेळी मनपा प्रशासन अमरावतीकरांसमोर सादर करतील अशी माहिती त्यांनी दिली मात्र अन्य प्रश्न त्यांना विचारल्यास त्यांनी नकार दिला.सदर प्रकरणी सविस्तर असे की, अमरावती महानगरपालिका मध्ये येणाऱ्या झोननिहाय सफाई कंत्राटातील तब्बल ४० लक्ष रुपयाचा आर्थिक अपहार झाल्याची तक्रार राहुल माटोडे यांनी कोतवाली ठाण्यात दाखल केली होती.सदर आर्थिक अपहार महानगरपालिकेच्या उपयुक्त डॉ. मेघना वासनकर व आरोग्य विभागातील पि.टी.चव्हाण या दोघांनी मिळून केला असल्याचे त्यांनी आपल्या आरोपात म्हटले होते.या प्रकरणी त्यांनी आपली तक्रार सुद्धा कोतवाली ठाण्यात दाखल केली आहे.काही महिन्यांपूर्वी अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील साफसफाईसाठी एकूण पाच झोन प्रमाणे कंत्राटीची निविदा काढण्यात आली होती.त्यामध्ये विशिष्ट कंत्राटदारांना निविदा मिळावी म्हणून त्यांनी विशिष्ट अटी व शर्ती टाकून नियमबाह्यरीत्या पूर्वीचा कंत्राट संपुष्टात येण्यापूर्वीच म्हणजे पूर्वीचा कंत्राट संपण्याच्या सहा महिने अगोदरच सदर कामाचे कार्याध्यक्ष देण्यात आले होते.सदर काम पाच वर्षाच्या कालावधीसाठी होते. निवेदेप्रमाणे तीन वर्षे जवळपास १२० कोटी रुपयांसाठी सदर निविदा बोलवण्यात आली होती परंतु या कामाचे कार्यादेश देताना सदर काम पाच वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आले हे विशेष ज्याची किंमत जवळपास २०० कोटी रुपये आहे.वास्तविक सदर कार्यादेश देण्यापूर्वी शासकीय नियमाप्रमाणे निविदा किमतीच्या कमीत कमी एक टक्का सुरक्षा रक्कम जमा करण्याची तरतूद अमरावती महानगरपालिकेत आहे.यानुसार पाच झोन च्या कंत्राटदारांकडून जवळपास दोन कोटी रुपये मनपाच्या तिजोरीमध्ये सुरक्षा रक्कम म्हणून जमा करणे आवश्यक होते परंतु अशी कोणतीही सुरक्षा ठेव रक्कम सदर कार्यादेश देण्यापूर्वी जमा करण्यात आलेली नाही.या उलट कामाच्या निविदेसोबत भरण्यात आलेली इसारा रक्कम, जी सुरक्षा रकमेचा भाग असते ती जवळपास ४० लाख रुपये कार्यादेश म्हणजेच वर्क ऑर्डर दिल्याच्या दुसऱ्या दिवशी कंत्राटदारांना परस्पर आर्थिक संगनमत करून परत देण्यात आली.याच प्रकरणाबद्दल शिवसेनेचे समन्वयक राहुल माटोडे यांनी महानगरपालिकेच्या उपयुक्त वासनकर व पि.टी.चव्हाण यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.या संपूर्ण प्रकरणावर त्यांची आज बाजू घेताना त्यांनी सांगितले की,सदर प्रकरण लवकरच मनपा अमरावतीकरांच्या समोर आणून सत्य मांडतील व तक्रार करणाऱ्या लोकांना त्यांची उत्तरे मिळतील या प्रकरणाबद्दल अतिरिक्त प्रश्न विचारताच वासनकर यांनी काही बोलण्यासाठी नकार दिला.

# २५ डिसेंबरपूर्वी कुणबी-मराठा तिढा सुटणार; मराठा उपसमितीचे सदस्य नरेंद्र पाटलांना विश्वास

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :९**

सभागृहाच्या कामकाजात मराठा आरक्षणावर विस्तृत चर्चा होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणे येत्या २५ डिसेंबरपूर्वी कुणबी-मराठा तिढा सुटेल, असा विश्वास मराठा उपसमितीचे सदस्य नरेंद्र पाटील यांनी मंगळवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी चर्चा करताना व्यक्त केला.



राज्यात सध्या मराठा आरक्षणावरून वादंग उठले आहे. अशात आरक्षणाचा मुद्दा लवकरात लवकर सुटावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अशात मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा दिला आहे. मागासवर्गीय आयोगाच्या कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नरेंद्र पाटील म्हणाले,'मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांनी वैयक्तिक कारणांनी राजीनामा दिला असावा. सरकार लवकरच नवीन अध्यक्षांची निवड करेल. सरकारच्या आयोगाच्या कामकाजात हस्तक्षेप नाही. आयोग स्वतंत्र संस्था आहे. आयोगाने स्वत:चे संशोधन अहवालांच्या आधारावर मत मांडायलाच हवे. आयोगावर कुणीही दबाव टाकलेला नाही. तसेच आयोगदेखील दबावात काम करत नाही. अध्यक्ष म्हणून काम करण्यास त्यांनी स्वत:ला असमर्थ समजल्यामुळे राजीनामा दिला असावा.

## ...तेव्हा आरक्षण न देण्यासाठी दबाव आणला

क्युरेटिव्ह पिटीशन हा सर्वोच्च न्यायालयाचा विषय आहे. त्यावर याचिकेवर मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याचा कुठलाही परिणाम होणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे, बापट समितीच्या अहवालानुसार, मराठ्यांना आरक्षण मिळावे, असा निर्णय जवळपास झाला होता. मात्र, तत्कालीन राजकारण्यांनी मराठ्यांना आरक्षण मिळू नये यासाठी दबाव टाकला होता. आता तशी स्थिती नाही. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे लवकरच चर्चा करून मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षाची निवड करतील, असे नरेंद्र पाटील म्हणाले.

# महादेव कोळी जमात, शेतकरी प्रश्नांची यादी मुख्यमंत्र्यांना सादर

## नितीन कदम यांना वर्षा निवासस्थानी निमंत्रण



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महादेव कोळी जमातीच्या मागण्यांचा विषय जाणीवपूर्वक स्वतः हाताळण्यासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे निवेदन संकल्प बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या नेतृत्वात सोमवारी नागपूर येथे विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.

महादेव कोळी जमात गेल्या अनेक वर्षांपासून पायाभूत सुविधांपासून वंचित असताना त्यांचा वैध मागण्याना पुरेसा आधार मिळाला नाही. महादेव कोळी जमातीच्या आंदोलनाचे खच्चीकरण केले जात आहे. जातीचे प्रमाणपत्र देण्याची मागणी समाजाकडून होत आहे. उपोषण केले जात आहे, तरी त्याकडे लक्ष दिले जात नाही, असे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनात आणून देण्यात आले.

त्याचप्रमाणे जिल्हातील अमरावती शेतकऱ्यांच्या पिकविमा व दुष्काळी मदत इत्यादी व्यथा मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यात आल्यात. अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट असून त्यांना निसर्गाचा प्रकोप व सावकारी कर्जाला बळी पळावे लागते. येथील शेतकरी आत्महत्येचा आलेख वाढता आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या समस्या गांभीर्याने दखल घेत नाही. शासनाने मंजूर केलेल्या १७०० कोटी रुपयाचा अग्रिम पिकविमा रकमेमध्ये अमरावती जिल्ह्याच्या नावे फक्त ८ लाख रुपये देण्यात आलेत. त्या८ लाख रुपयांमध्ये शेतकऱ्यांची संख्या १०,२६५ आहे. म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला ७८ रुपये येत आहे, असे मुख्यमंत्र्यांना सांगण्यात आले. ही शेतकऱ्यांची चेष्टा असून शासनाने जाहीर केलेली २५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना देण्यात यावी, असे मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नितीन कदम यांना मुंबईस्थित वर्षा निवासस्थानी येऊन चर्चा करण्याचे निमंत्रण दिले.

# अजित पवारांना भाजपा कधीही मुख्यमंत्री करणार नाही, ठाकरे गटाच्या नेत्याचा दावा

**दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे सध्या महाराष्ट्र विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन सुरू आहे. दरम्यान, ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी सोमवारी (११ डिसेंबर) भारतीय जनता पार्टीवर जोरदार हल्लाबोल केला. अजित पवार यांना मुख्यमंत्री करा. मी पाठिंबा देतो आणि सभागृहात ठराव मांडतो. मला तुमचा दम बघायचा आहे. माझ्या पक्षाची हमी मी घेतो, असं आव्हान भास्कर जाधव यांनी भाजपाला दिलं. ज्याच्याबरोबर मैत्री कराल, त्याचं वाटोळं केल्याशिवाय राहत नाही, अशी टीकाही भास्कर जाधवांनी भाजपावर केली. यावर आता ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

# महानुभाव पंथातील 'साहित्य शिरोमणी' निखळला

## जेष्ठ साहित्यिक प्रा.पुरुषोत्तम नागपुरे उपाख्य कारंजेकरदादा यांचे निधन

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

वयाची ब्यान्नवी पार केल्यानंतरही व्रतस्थपणे लेखन, वाचन करणारे महानुभाव पंथाचे जेष्ठ साहित्यिक व संत प्रा.पुरुषोत्तम नागपुरे उपाख्य ईश्री कारंजेकर दादा यांचे १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. अमरावती येथे निधन झाले. बुधवार १३ डिसेंबर रोजी त्यांची अंतेष्टी अमरावती येथील गांधीनगर निवासस्थानावरुन सकाळी ११ वा. केल्या जाणार आहे.

प्रा.पुरुषोत्तम नागपुरे यांच्या निधनाने एका संवेदनशिल लेखकाला महानुभाव व मराठी साहित्य विश्व मुकले आहे.वर्धा जिल्हयातील खडकी येथील स्वातंत्र्य संग्राम सेनानी चंद्रभानजी नागपुरे यांचे पुत्र म्हणून जन्माला आलेले पुरुषोत्तम नागपुरे हे महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण विभागात ३५ वर्ष सेवा करत एमईएस वर्ग १ या पदावरुन पुणे येथुन १९९१ ला सेवानिवृत्त झाले. विविध साहित्य संशोधन व ग्रंथाचे लेखन त्यांनी केले असुन जवळपास ३२ ग्रंथ त्यांनी लिहीले असुन त्यात प्रामुख्याने लीळा चरित्र ग्रंथाचा समावेश आहे. स्वातंत्र्यसंग्राम सेवा अभिषेक, महानुभावांचे वैदिकत्व, वाद-प्रवाद, संशोधनात्मक वैचारिक लेख, महानुभाव : एक आवाहन,प्राचीन मराठी काव्य ग्रंथ ज्ञान प्रबोध, श्री चक्रधरांची सुबोध जीवनगाथा जय श्री चक्रधरा, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त कथा सुर्य उगवला, श्री चक्रधरांच्या भ्रमणांची भौगोलिक माहिती, तिर्थप्रसाद, महाराष्ट्र शासन संपादीत ग्रंथ चक्रधर दर्शन, चरित्र संशोधन लीळा चरित्र , कादंबरी पंढरीस संदेश, ऐतिहासीक कादंबरी दरना अशा विविध ग्रंथ, कादंबरी व पुस्तकाची निर्मिती त्यांनी आपल्या लेखनीतून विपूल साहित्य संपदा निर्माण केली. श्री क्षेत्र रिध्दपूर येथे श्री प्रभु प्रबोधन संस्था स्थापन केली. महानुभाव या मासीक पत्रिकेचे तथा ओज या साप्ताहिकाचे संपादनही तेच करत. नागपुर विद्यापीठाचे १२ वर्ष सिनेट सदस्य, तर अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात महानुभाव साहित्य संशोधन केंद्राची स्थापनेत त्यांचा मोठा वाटा होता. अखिल भारतीय महानुभाव साहित्य सेवा मंडळाच्या वतीने देशातील विविध भागात ११ साहित्य संमेलनांचे आयोजन त्यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरित्या करण्यात आले होते. साहित्य क्षेत्रातील कार्याकरीता त्यांना जीवन गौरव पुरस्कार , अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे सम्मान पत्र , संशोधन साहित्य रत्न पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, अशा विविध पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला होता.



# भाजपा आणि मिंधे सरकार देशातील लोकशाही मारायला, आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

**दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मागील अनेक महिन्यांपासून महाराष्ट्रात सत्तासंघर्ष चालू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेवर सुनावणी चालू आहे. दोन्ही गटातील विविध नेत्यांची साक्ष नोंदवली जात आहे. दरम्यान, ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.



राज्यातील भाजपा आणि मिंधे सरकार देशातील लोकशाही मारायला निघालं आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली. ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सत्तासंघर्षाचा निकाल आमच्याच बाजुने लागेल आणि गद्दार आमदार (शिंदे गट) अपात्र ठरतील, अशी आम्हाला खात्री आहे, असंही आमदार ठाकरे म्हणाले.